शुक्रवार, २२ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २०९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 22 MARCH 2024 | adhunikkesari.com | •YEAR-03 •ISSUE-209 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-12 •PRICE-05

# नाक दाबल्यावर एसबीआयने तोंड उघडले

## निवडणूक रोख्यांसंदर्भातील सर्व माहिती निवडणूक आयोगाला सादर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला मागच्या सुनावणीत निवडणूक रोख्यांचा सगळा तपशील सार्वजनिक करावा, त्यात कुठलीही लपवाछपवी नको, असे म्हणत खडेबोल सुनावले होते. त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाने निवडणूक आयोगाला विशिष्ट क्रमाकांसह निवडणूक रोख्यांचे सर्व तपशील सादर केले आहेत, असे पत्रच एसबीआयने सर्वोच्च न्यायालयात गुरूवारी सादर केले. बँकेचे अध्यक्ष दिनेश कुमार खारा यांनी प्रतिज्ञापत्रात सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, २१ मार्च २०२४ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाने त्यांच्या ताब्यातील निवडणूक रोख्यांचे सर्व तपशील भारतीय निवडणूक आयोगाला सादर केले आहेत.**



बाँड खरेदी करणाऱ्याचे नाव, त्याचे मूल्य आणि विशिष्ट क्रमांक, ज्या पक्षाने तो वटवला त्या पक्षाचे नाव, बाँडची पूर्तता करणाऱ्या राजकीय पक्षांच्या बँक खाते क्रमांकाचे शेवटचे चार अंक आणि रोख रकमेचा क्रमांक, ही माहिती या तपशीलातून देण्यात आली आहे. तसेच खातेधारकांच्या सुरक्षेचा हवाला देत बँकेने राजकीय पक्ष आणि खरेदीदार या दोन्हींचे संपूर्ण बँक खाते क्रमांक आणि केवायसी तपशील उघड करणे टाळले आहे.

राजकीय पक्षांचे संपूर्ण बँक खाते क्रमांक आणि केवायसी तपशील सार्वजनिक केले जात नाहीत, कारण यामुळे खात्याच्या सुरक्षिततेशी (सायबर सुरक्षा) तडजोड होऊ शकते, खारा यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच, खरेदीदारांचे केवायसी तपशील सुरक्षेच्या कारणास्तव देखील सार्वजनिक केले जात नाहीत. अशी माहिती प्रणालीमध्ये भरलेली नाही, असे त्यात नमूद केले आहे. एसबीआयने आता सर्व तपशील उघड केले आहेत. १५ फेब्रुवारी २०२४ च्या आदेशानुसार कोणतेही तपशील जाहीर करण्यापासून रोखले गेले नाही, असंही प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे. एसबीआयने गुरूवारी शेअर केलेले तपशील निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केले जाण्याची शक्यता आहे.

# शिवसेना छत्रपती शाहू महाराजांना विजयी केल्याशिवाय गप्प बसणार नाही : ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** शाहू महाराजांच्या प्रचाराला येणार असे मी त्यांना वचन दिले आहे. शिवसेना छत्रपती शाहू महाराजांना विजयी केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी कोल्हापुरातील न्यू पॅलेस येथे शाहू महाराज छत्रपती यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते. यावेळी तेजस ठाकरेही उपस्थित होते उद्धव ठाकरे यांनी शाहू महाराजांची गळाभेट घेतली. उद्धव ठाकरे म्हणाले की, ठाकरे कुटुंबिय आणि शाहू महाराज यांचे ऋणानुबंध अतूट आहेत. महाविकास आघाडीकडून शाहू महाराजांचे नाव लोकसभेसाठी जाहीर करण्यात आले आहे. शिवसेना छत्रपती शाहू महाराजांना विजयी केल्याशिवाय गप्प बसणार नाही. विजयी मेळाव्याला देखील मी येणार, असा शब्द शाहू महाराजांना दिलेला आहे. मीही शाहू महाराजांच्याकडे काहीतरी मागितले आहे. त्यामध्ये इथून पुढच्या काळामध्ये शाहू महाराजांची साथ मिळावी, अशी इच्छा बोलून दाखवली आहे. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शाहू महाराजांना शिवसैनिक ताकदीने विजयी करतील कारण हा आमच्या अस्मितेचा विषय आहे. मी फक्त आत्ताच आलोय. मी शाहू महाराजांचा प्रचार करणार आहे. शिवाय त्यांच्या विजयी सभेला देखील येणार आहे. आमच्या विजयासाठी मी त्यांचे आशीर्वाद घेतले आहेत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे 1997 मध्ये इथे आले होते. त्यानंतर मी प्रथमच या ठिकाणी आलो आहे. आम्ही महाराजांना पूर्ण ताकदीने विजयी करणार आहोत. महाविकास आघाडीकडून कोल्हापुरात शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी दिली जाणार असल्याचे निश्चित झाले आहे. मात्र, महाविकास आघाडीतील कोणत्या पक्षाकडून त्यांना उमेदवारी दिली जाणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष शाहू महाराज आमचेचं आहेत, असा दावा करताना दिसत आहे. यापूर्वी शरद पवार, संजय राऊत यांनी देखील शाहू महाराजांची भेट घेतली होती.




चर्चेतील बातमी

## अमेरिकेतून भारतीय विद्यार्थी बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** अमेरिकेतून एक भारतीय विद्यार्थी बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. मूळचा हैदराबादच्या नचराम भागातील रहिवासी असलेला २५ वर्षीय युवक मोहम्मद अब्दुल अरफात ७ मार्च पासून अमेरिकेच्या क्लीवलँडमधून बेपत्ता झाला आहे. अजूनही त्याला शोधण्यात यश आलेले नाही. अरफातचे वडील मोहम्मद सलीम यांनी मुलाच्या सुरक्षेसाठी केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना या प्रकरणी मदत करावी असे पत्र लिहिले आहे. या पत्रातून सलीम यांनी परराष्ट्र मंत्रालयाने वॉशिंग्टन डीसी तसेच शिकागो येथील भारतीय दूतावासांना आपल्या मुलाच्या ठावठिकाण्याबाबत विचारणा करण्याची मागणी केली आहे. मोहम्मद अब्दुल अरफातच्या आई वडिलांनी पीटीआयशी बोलताना सांगितलं की काल एका अनोळखी नंबरवरुन खंडणीसाठी कॉल आला होता. कॉल करणाऱ्यांनी त्यांना मुलाचे अपहरण झाल्याचे सांगून, त्याच्या सुरक्षित सुटकेसाठी १ लाख रुपये खंडणी मागितली. सोबतच त्यांनी पैसे दिले नाही तर त्यांच्या मुलाची किडनी विकायला काढू अशी धमकीही दिली. परंतु पैसे कोणत्या प्रकारे पाठवायचे हे मात्र त्यांनी सांगितलं नाही.

# आदर्श आचारसंहितेचे पालन करा : बालाजी क्षीरसागर

## कोपरगाव तहसील कार्यालयात आचारसंहिता सूचना बाबत बैठक


आधुनिक केसरी न्यूज

किसन पवार

कोपरगाव : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुक- २०२४ चा कार्यक्रम जाहिर केला आहे. जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुका शांततेत पार पाडाव्यात या दृष्टीने सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे. अधिकारी व कर्मचारी यांची कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा कडक इशारा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी क्षिरसागर यांनी दिला. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहितेची अंमलबजावणीच्या सूचनांसाठी शिर्डी लोकसभा मतदारसंघातील कोपरगाव तालुक्यातील नियुक्त अधिकारी - कर्मचाऱ्यांची कोपरगाव तहसील कार्यालयात सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी क्षिरसागर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिर्डी पोलीस उपअधीक्षक शिरिष वमने, कोपरगाव चे तहसीलदार संदीप कुमार भोसले, विकास गंबरे, पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, तालुका पोलिस निरीक्षक संदीप कोळी, राहात्याचे पोलीस निरीक्षक सोपान काकड, निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, नायब तहसीलदार मनिषा कुलकर्णी, यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते. बालाजी क्षिरसागर म्हणाले की, जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितचे अनुषंगाने शासकीय जागेवरील बॅनर, पोस्टर काढण्यात येवून अंमलबजावणी करण्यात यावी. दि महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ व भारत निवडणूक आयोग, दिल्ली यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्देश यानुसार विना परवाना खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर पोस्टर्स लावणे, घोषणा लिहिणे, निवडणूक चिन्ह लिहिणे, कापडी फलक लावणे, झेंडे लावणे व इतर कारणाने सदर मालमत्ता विद्रुपित करणेवर बंदी घातलेली आहे. अशा प्रकारे ज्या राजकीय पक्ष उमेदवाराने खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्ता विद्रुपित केली असेल त्यांनी अशी पोस्टर्स, भित्ती पत्रके, घोषणा, झेंडे, कापडी फलक, व चिन्ह इ. काढून टाकण्याची तातडीने व्यवस्था करावी. दि महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेन्ट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ अन्वये अशा प्रकारे मालमत्ता विद्रुपित केल्यास ३ महिन्यापर्यंत तुरुंगवास अथवा दोन हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्हीही शिक्षेस संबंधित इसम पात्र राहील.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# पुण्यातील आनंदाश्रम संस्था : एक दीपस्तंभ




आधुनिक केसरी

त्यांची विषयावर विभागणी करून ती लोखंडी कपाटात ठेवली जातात. त्यांना कीड लागू नये म्हणून वेखंडाची पावडर, कडू जिरे, लवंग, मिरे पावडर इ. चा वापर केला जातो. ही हस्तलिखिते आम्लमुक्त अशा कागदामध्ये गुंडाळून लाल रंगाच्या कपड्यात बांधली जातात. या संस्थेत साधारणपणे किती हस्तलिखिते असतील ? आपण कल्पना करू शकणार नाही पण येथील हस्तलिखितांची संख्या १५,१०३ आहे आणि ही हस्तलिखिते २६ वेगवेगळ्या अशा विषयांवर आहेत. येथे ' ज्योतिषरत्नमाला ' नावाचे हस्तलिखित सर्वात जुने म्हणजे शके १३७१ ( सन १४४९ ) मधील आहे. भारतभर फिरून मोठ्या कष्टाने त्यांचा संग्रह करणारे महादेवजी आपटे आणि त्यानंतर त्यांचे निगुतीने जतन आणि संवर्धन करणारे ध्येयवादी विश्वस्त आणि कर्मचारी यांच्या प्रशंसेसाठी शब्द कमी पडतात. या ठिकाणी अत्यंत शांत आणि प्रसन्न वातावरण असते. आपणही शांततेच्या वातावरणाचा भंग होणार नाही आणि या मौल्यवान ठेव्याला धक्का पोहोचणार नाही अशा पद्धतीने हा दुर्मिळ खजिना पाहणे अपेक्षित असते. २०२२ पासून या संस्थेने ' आनंदाश्रम परिक्रमा ' हा एक नवीन उपक्रम सुरु केला आहे. या अंतर्गत प्रत्येकाला संस्थेमध्ये उपलब्ध असलेला हस्तलिखितांचा संग्रह पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या शुक्रवार, शनिवार व रविवारी या हस्तलिखितांचे प्रदर्शन भरवले जाते. या निमित्ताने संस्थेने पुनर्मुद्रित केलेल्या ग्रंथांची माहिती सुद्धा लोकांपर्यंत पोहोचते. या प्रदर्शनाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आतापर्यंत फक्त पुणेकरांनीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील असंख्य लोकांनी याचा लाभ घेतला. आपण पर्यटनानिमित्त अनेक निसर्गरम्य ठिकाणी जातो. पण प्राचीन काळातील आपला हा ठेवा पाहायचा असेल आणि पुढील पिढीला माहिती करून द्यायचा असेल तर आपल्या मुलांसह आवर्जून अशा ठिकाणी जायला हवे. या ठिकाणी गेल्यानंतर हस्तलिखित म्हणजे काय, कोणकोणत्या भाषेमध्ये ती आहेत, त्यांचे विषय कोणते आहेत, त्यांचे जतन आणि संवर्धन कशा प्रकारे केले जाते याची माहिती आपल्याला मिळू शकते.



## आनंदी पहाट

# संगत परिसाची असावी, म्हणजे आयुष्याचे सोने होते

आधुनिक केसरी

जीवनात यशस्वी होण्यासाठी जशी उच्च शिक्षणाची गरज असते, तशीच प्रत्येक व्यक्तीला चांगल्या संगतीची सुद्धा गरज असते, हे प्रत्येक व्यक्तीने कधीही विसरून चालणार नाही. आपण आपल्या सोबत्यांची निवड विवेकपूर्वक करत असल्याची आपल्याला जाणीव होणे जरुरीचे असते. कारण, आपली संगत आपल्यावर वाईट प्रभाव पाडू शकते, ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. जगण्यापलीकडचे जीवन जगताना संगत ही खूप महत्वाची बाब असते. लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो. अनकेदा आपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते. जशी आपली संगति, तशी आपली मनोवृत्ती, ही बाबही तितकीच महत्वाची आहे. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली- वाईट, जवळची-लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. वाईट संगतीत वाईट गुण आपल्यात येण्यास वेळ लागत नाही. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो. परीसाच्या संगतीत लोखंड आल्यावर त्याचे सोने होते. त्यासाठी संगतीचा परिणाम विपरीत ठरू नये, हेही लक्षात घ्यावे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## ईश्वराचे जाणा | दास तुम्ही ||


आमुच्या घरात | भौतिकाची वाण ||
परमार्थाची खाण | शांतीरूप ||१||
दारिद्र्याची येथे | असते झालर ||
सोने अलंकार | समाधान ||२||
आमुच्या दारात | फुलते तुळस ||
झळाळे कळस | चैतन्याचा ||३||
चाले हरिनाम | जेथे रात्रंदिन ||
आम्हा ते सदन | विठोबाचे ||४||
नश्वराचे ठायी | नको गुंतू मना ||
ईश्वराचे जाणा | भक्त तुम्ही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### चैतन्य रूपेण संस्थिता...


आचार्य शंकरांच्या बाबतीत घडलेला एक प्रसंग आहे. आचार्य शंकर निर्विशेष ब्रह्मतत्त्वाचे प्रतिपादन करतात. ज्यात त्यांनी शक्ती तत्त्वास माया संबोधून अस्वीकृत केले आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी राजराजेश्वरी आई भगवतीने लीला केली. एक दिवस श्री शंकराचार्य काशीला स्नानासाठी मणिकर्णिकेच्या घाटावर गेले. तेथे एक लावण्यवती, तरुणी रस्ता अडवून, पतीचे प्रेत मांडीवर ठेवून भीक मागत होती. तिला पतीचा अंत्यसंस्कार करायचा होता. शंकराचार्यांच्या संन्यस्त नियमावलीप्रमाणे शव ओलांडून जाणे शक्य नव्हते. त्यांनी त्या स्त्रीस विनंती केली की, ‘आई! प्रेत जरा रस्त्यातून बाजूला घे म्हणजे मला पुढे जाता येईल. स्त्री उतरली - ‘तूच प्रेताला बाजूला व्हायला सांग की!’ आचार्य शंकराने आश्चर्याने प्रश्न केला - ‘आई, प्रेतामध्ये स्वतः बाजूला होण्याची शक्ती कशी असणार? तरुणीरूप देवीने म्हटले - ‘का? तू तर शक्तिरहित निर्विशेष ब्रह्मतत्त्वाचे निरुपण करतोस. शक्तिरहित तुझ्या ब्रह्म्याने इतक्या विशाल ब्रह्मांडाचे निर्माण, संचालन कसे केले आहे?’ अचानक विद्युत-झटका बसल्याप्रमाणे आचार्यांचे ज्ञानचक्षु उघडले. प्रसंगाचे तात्पर्यध्यानी आले. भगवतीस प्रणाम करण्यासाठी सरसावले तो तेथले सर्व दृश्य लोप झाले होते. महासंन्यासी शंकराचार्यांनी भक्तीने गद्गद होऊन ‘काशीपुराधीश्वरी’ महाशक्तीची वंदना करणारे अन्नपूर्णा स्तोत्र रचले व गायले. देवी भगवतीने अनेक सिद्ध, महात्म्यांना ज्ञानामृत व वैराग्य-माधुर्याची भिक्षा दिली आहे. शंकराचार्यांनी चतुर्भुजा, द्विभुजा देवीचे हे स्तोत्र रचून प्रसादरूप वरदान मागितले आहे - ‘अन्नपूर्णा सदापूर्णे शंकर प्राणवल्लभे। ज्ञानवैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती।’

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

वाणी जाल अपार है, भूलि परे सब जीव ।
देव सदाफल शरण गहु, तब पाओ निज पीव ।।१२०।।(स्वर्वेद पंचम मण्डल अष्टम अध्याय) ०५/०८/१२०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
वाणीजाल अपार आहे, ज्यात अज्ञानाने सर्व जीव अडकलेले आहेत. ते सद्गुरूंची वाणी ओळखत नाहीत. म्हणून अनुभवहीन वाचक ज्ञानींच्या वाणी-जालास सोडून सद्गुरूंना शरण यावे, मग त्यांच्या उपदेश, सत्य ज्ञान आणि सन्मार्गावरील साधनेद्वारे आपल्या परमप्रभूची प्राप्ती होईल.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# प्रपंचात 'राम कर्ता' ही भावना ठेवावी

आधुनिक केसरी

परमात्मा आनंदरूप आहे. भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. भगवंताच्या हास्यमुखाचे ध्यान करावे. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहात असतो. उकाड्यात वारा आला, त्याला वाटते बरे झाले; पाऊस आला की त्याला वाटते, आता गारवा येईल. कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहात असतो. मनुष्याला भूक लागेल तेव्हा तो जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल आणि त्यापासून त्याला आनंद होईल; परंतु त्याने विष खाल्ले तर त्याने आनंद न होता मरण मात्र येईल. तसे आपले होते. आपण विषयातून आनंद घेऊ पाहतो आणि तो बाधक होतो. एखाद्या रोग्याला जर जंत झाले आणि त्याला जर खूप खायला घातले तर ते शरीराला पोषक न होता जंतच वाढतात; त्याचप्रमाणे आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून ती केली, तर त्यामुळे विषयच पोसले जाऊन, त्यांपासून समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही.मनुष्य जन्मभर जो धंदा करतो त्याच्याशीच तो तद्रूप



होऊन जातो. एखादा वकील घ्या, तो त्याच्या धंद्याशी इतका तद्रूप होतो की, मरतेवेळीसुद्धा तो वादच करीत जाईल. नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की, स्वप्नातदेखील तो स्वतःला नोकर समजूनच राहतो. कर्म कसे करावे तर त्याच्यातून वेगळे राहून. लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत, परंतु ते दुसऱ्याचे आहेत असे समजून. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत असे मानून; नाही तर व्याह्यांची काळजी लागायची, किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष लागायचे ! त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हणून, ‘अगदी हलायचे नाही, पापणी, हात, पाय, काहीही हलवता कामा नये,’ असे सांगितले तर ते जसे त्याला शक्य होणार नाही, तसे काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की, कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे ‘राम कर्ता’ ही भावना विसरून केली तर बाधक होतात आणि मरणापर्यंत माणूस पुढल्या जन्माची तयारी करीत राहतो; तेव्हा, देहाने कर्म करतानाही ‘ कर्ता मी नव्हे ’ हे जाणून कर्म करावे. आपल्याला कर्म केल्याशिवाय करमत नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत असतो. आपण फळाची आशा सोडून कर्म करू लागलो, की ते कर्म करीत असतानाच समाधान प्राप्त होते. **७२. प्रपंचात सर्वांकरिता सर्व करावे , पण मनात मात्र 'मी रामाचा आहे' ही अखंड आठवण ठेवावी, म्हणजेच त्याच्या नामात राहावे.**

## अनिर्वाच्यनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तर शब्दसमुह हा वाच्यांश आहे. त्याची थोडक्यात फोड मी पुढील प्रमाणे करत आहे.**आपल्याशी कोणी बोलत आहे तेव्हा त्याचें शब्द ध्वनी रूपात आपल्या कानी पडत आहेत. हा झाला भाषेचा वाच्यांश. आता शब्द कानावर पडत असले तरी त्याचा मनाला काही तरी बोध होतो त्या बोधाला अर्थ म्हणतात. यालाभाषेचा लक्षांश म्हणतात. शब्दांचा संबंध शरीराशी तर अर्थाचा संबंध मनाशी अधिक असतो.संवादामध्ये शब्द गौण तर अर्थ प्रधान असतो. म्हणजे समर्थ भाषेचे तत्वज्ञान सांगतात की "वाच्यांश टाकावा लक्षांश समजून घ्यावा आणि त्याचें स्वानुभावात रूपांतर करावे. जय जय रघुवीर समर्थ.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
adhunikkesari.com
शुक्रवार, २२ मार्च २०२४

# महाविकास आघाडीचे जागावाटप दोन दिवसांत

## नाना पटोले : भारतीय जनता पक्ष घाबरल्यानेच महाराष्ट्रात पाच टप्प्यांत मतदान

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाविकास आघाडीची जागा वाटपावर चर्चा झाली असून वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकपा या मित्रपक्षांशी बोलणी झालेली आहे, वंचितसोबतही आजही चर्चा झाली आहे. काँग्रेस पक्षाचे उमेदवारही जवळपास निश्चित झाले आहेत. सर्व मित्र पक्षांशी चर्चा करून महाविकास आघाडीचे जागावाटप आणि उमेदवार दोन तीन दिवसात जाहीर होतील, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे.
टिळक भवन मध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी आज सकाळी चर्चा झाली. या चर्चेत काँग्रेसकडून मी तर शिवसेनेकडून खासदार संजय राऊत उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलणी केली. जागा वाटपाबरोबर प्रचार सभा व इतर मुद्द्यांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. राज्यातील सर्व ४८ जागा महाविकास आघाडीत लढवत आहे. आघाडीतील सर्व मित्रांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेनंतर काही जागांची अदलाबदल होऊ शकते आणि याबाबतचा निर्णय दोन दिवसात होईल. भारतीय जनता पक्षाने मागील १० वर्षात देश बरबाद केला आहे. लोकशाही, संविधानाला न जुमानता मनमानी कारभार केला आहे. महाविकास आघाडी मजबूत करून भाजपाच्या या अत्याचारी सरकारला सत्तेतून खाली खेचणे हेच लक्ष्य आहे. राहुल गांधी यांनी ज्या शक्तीचा उल्लेख केला त्या आसुरी शक्तीविरोधात काँग्रेसचा लढा आहे. परंतु भाजपाकडे मुद्देच नसल्याने त्यांनी शक्ती शब्दाचा विपर्यास केला आहे. मणिपूरमध्ये महिलांवर अत्याचार होत असताना, देशभरात महिला अत्याचार होत असताना भाजपा व मोदींना नारी शक्तीची आठवण का झाली नाही आजच नारी शक्ती कशी आठवली? गुजरातमध्ये एकाच टप्प्यात मतदान होत आहे, महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान घेण्याची काही गरज नव्हती परंतु भारतीय जनता पक्ष घाबरलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान घेतले जात आहे.
लोकसभा निवडणूक लढवणार का, या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मी काँग्रेस पक्षाचा एक शिपाई आहे, पक्ष जो आदेश देईल तो मला मान्य आहे. २०१९ मध्ये पक्षाने आदेश देताच नागपूर लोकसभा निवडणूक लढवली होती, असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.
या पत्रकार परिषदेला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, प्रदेश प्रवक्ते भरतसिंह आदी उपस्थित होते.

# बांध फुटलाय, पाणी वाहायला लागलंय, अनेक जण बाहेर पडतील

## बजरंग सोनवणे यांच्या पक्षप्रवेशानिमित जयंत पाटील यांनी दिले मोठे संकेत

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** अजित पवार गटाचे बीड जिल्ह्यातील नेते बजरंग बाप्पा सोनावणे यांनी आज राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी बांध फुटलाय आणि पाणी वाहायला लागलंय, अनेक जण बाहेर पडतील असे सुचक वक्तव्य जयंत पाटील यांनी केले आहे. या पक्षप्रवेश सोहळ्यात जयंत पाटील म्हणाले की, पक्षात फुट पडली त्यावेळी बजरंग बाप्पा नेहमीच भेटत राहिले ते कधी तिकडे गेलेच नाही अशीच परिस्थिती आहे. मागच्या आठवड्यात आम्ही याच ठिकाणी आमदार निलेश लंके यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा घेतला होता. तो फक्त पुस्तक प्रकाशनाचा सोहळा होता. निलेश लंकेंनी बांध फोडलेला आहे, आता पाणी वाहायला सुरुवात झाली आहे. हळुहळु अनेक बाहेर फोडायला उत्सुक आहेत. त्यामुळे बजरंग बाप्पाच्या प्रवेशाला महत्त्व आहे असे त्यांनी सांगितले.
बीडकर प्रचंड उत्साहाने या ठिकाणी उपस्थित होते. बजरंग बाप्पांनी मागची लोकसभा लढवली आणि चांगली मते घेतली. लोकांशी सामान्य भाषेत संवाद साधण्याचा चांगला प्रयत्न केला पण यश आले नाही. आज या देशातील शेतकरी नाराज आहे, महागाई वाढली आहे, बेकारी वाढली आहे, जनता त्रागा करत आहे आणि त्यामुळे देशात आता धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी परिस्थिती आहे असे ते म्हणाले. इलेक्टोरल बाँड्सचे प्रकरण सध्या प्रचंड गाजत आहे. स्वच्छ मार्गाने भ्रष्टाचार कसा करायचा असा पायंडा घालण्याचा प्रकार या इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून करण्यात आली. कोणत्या पक्षाला किती बाँड्स मिळवण्याचा प्रयत्न होत होता पण सुप्रीम कोर्टाने तो प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाही असे म्हणत त्यांनी सुप्रीम कोर्टाचे आभार मानले. बजरंग बाप्पा यांचे पक्षात स्वागत करताना ते म्हणाले की, मला खात्री आहे की बीड जिल्हा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत ताकदीने लढेल. आज पवार साहेबांकडे देशातील राज्यातील जनता मोठ्या अपेक्षेने पाहत आहे. आदरणीय पवार साहेबही प्रत्येक माणसाला या प्रवासात जोडुन घेत आहे. ज्यात तरुणांची संख्या जास्त आहे. मला खात्री आहे की आपण एकजुटीने या देशातील परिस्थिती बदलून टाकू.

# छत्रपती संभाजीनगरातील कलावंतांसाठी संधी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक विषयावरील एका आगामी मराठी चित्रपटातील भूमिकांसाठी सर्व वयोगटातील स्त्री-पुरुष ज्येष्ठ व नवोदित कलावंतांच्या भेटीचे नियोजन 22 मार्च 2024 रोजी सायंकाळी 4 ते 6 या वेळेत देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे नाट्यशास्त्र विभागात करण्यात आले आहे. तरी सर्व कलावंतांनी येऊन भेटावे. अधिक माहितीसाठी आशिष मेश्राम 7709971810 यांच्याशी संपर्क साधावा.

# आमची तुतारी, पक्षाचं नाव निश्चित, ते कोणालाही देता येणार नाही

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आमची तुतारी आणि पक्षाचं नाव हे निश्चित झालं आहे. ते इतर कोणालाही देता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला निर्देश दिले आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना म्हटले आहे.
जितेंद्र आव्हाड म्हणाले की,सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तात्पुरत्या स्वरूपात घड्याळाचं चिन्ह वापरायला सांगितलं आहे. त्यातही, सर्व जाहिराती, पोस्टर, बॅनर, आणि अगदी झेंड्यावरही 'सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन राहून, अंतिम निर्णय येईपर्यंत, तात्पुरत्या स्वरूपात आम्ही हे चिन्ह वापरत आहोत' असं लिहिण्याचे आदेश दिले आहेत. तसेच अंतिम निर्णयापर्यंत तात्पुरतं चिन्ह देणं म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचं त्यांना डिस्क्लेमर हे चिन्ह आपलं समजू नका, हेच न्यायालयाला सुचवायचं आहे. विलीनीकरण हा एकच पर्याय आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले. याचा अर्थ त्यांचं स्वतःचं अस्तित्व मान्य नाही असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, शरद पवार साहेबांचा फोटो अजित पवार गटाचे राजू नवघरे आणि दिलीप बनकर हे आजही वापरत आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला म्हटले आहे की केंद्रीय कार्यालयातून यासंदर्भात नोटिफिकेशन काढून ते सर्व राज्यातील पदाधिकारी यांना पाठवावे असे निर्देश दिले आहे, असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.
पुढे जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सुनील तटकरे यांनी माझ्यावर टीका केली होती मी कोणालाही व्यक्तीगत बोलत नाही मी कोर्टात जे काही घडते त्यावर मी बोलत असतो कोर्टाने म्हटले होते की अजित पवार गटाला हिंदी, मराठी, इंग्रजी तसेच पॉम्प्लेंट वर जाहिरात करताना राष्ट्रवादी काँग्रेस घड्याळ चिन्ह संदर्भातील वाद न्यायप्रविष्ठ आहे असे नमूद करायला सांगितले आहे असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.
जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सुनील तटकरे यांच्यासारखे मगरमच्छ अश्रू माझ्या डोळ्यात येत नाही माझ्या डोळ्यात साहेबांसंदर्भात आदर आणि प्रेम असल्याने मनातून अश्रू येतात सुनील तटकरे यांच्या घरामध्ये सहा सहा पदं देण्यात आली होती वरिष्ठ असताना देखील पालकमंत्री पद अजित पवार यांच्या सांगण्यावरून देण्यात आले नव्हते ते तटकरे यांच्या कुटुंबात देण्यात आले होते असेही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.
यावर सविस्तर बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद सुरू असताना न्यायालयाने काही निरीक्षण नोंदवले न्यायालय म्हटले की अशाप्रकारे पक्ष बदलणे आणि अशा पक्षाला मान्यता कशाप्रकारे देऊ शकता १० शेड्युल आहे तरी कशासाठी असा प्रश्न यावेळी न्यायालयाने उपस्थित केला अशाप्रकारे पक्षातून बाहेर पडलेल्या गटाला दुसऱ्या पक्षामध्ये स्वतःला निलीनीकरण केल्याशिवाय पर्याय नाही त्यांना स्वातंत्र्य पक्ष म्हणून मान्य नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. घड्याळ हे चिन्ह ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने तात्पुरता असल्याचं नमूद करावे लागेल असे न्यायालयाने अजित पवार गटाला म्हटले आहे असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

# स्वाभिमानी असाल तर घड्याळ या निवडणूक चिन्हाचा त्याग करा

## मुख्य प्रवक्ते महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** संविधानाचे मूल्य पायदळी तुडवणाऱ्या अजित पवारांच्या पक्षाला सर्वोच्च न्यायालयाने काल संविधानाचा फटकार दिला आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.
महेश तपासे म्हणाले की, खरी राष्ट्रवादी विरुद्ध डुप्लिकेट राष्ट्रवादी प्रकरण सुप्रीम कोर्टात सुरू आहे. त्यावर न्यायमूर्तीने काल महत्त्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष यांना मिळालेला तुतारी वाजवणारा माणूस जे चिन्ह लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी कायम ठेवून अन्य कुठल्याही पक्षाला ते वापरता येणार नाही.
पुढे महेश तपासे म्हणाले, अजित दादा पवार गटाने अदृश्य शक्तीच्या मदतीने पवार साहेबांनी कष्टाने उभा केलेला मूळ राष्ट्रवादी पक्ष व चिन्ह घड्याळ हडपले.
निवडणूक आयोगाने फेब्रुवारी महिन्यात अजित पवारांना मूळ राष्ट्रवादी पक्ष व निवडणूक चिन्ह घड्याळ हे सुपूर्त केले त्यावर शरद पवार साहेबांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली आहे. काल झालेल्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्तींनी महत्त्वपूर्ण निर्णय दिला व एक प्रकारचा फटका अजित पवारांच्या राष्ट्रवादीला लगावला. घड्याळ या चिन्हाच्या वापराबाबत अटी व शर्ती लागू करण्यात आल्या असून मराठी हिंदी व इंग्रजी या भाषेतील वृत्तपत्राद्वारे जाहीर नोटीस प्रसारित करून त्यात घड्याळ चिन्ह संदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित आहे असे नमूद करण्यास अजित पवार गटाला आदेशित करण्यात आल्याचे महेश तपासे यांनी सांगितले.

# सर्वात सुखी देश

आधुनिक केसरी

जागतिक आनंदी देशांचा २०२४ चा अहवाल या आठवड्यात प्रसिद्ध करण्यात आला होता. या अहवालानुसार फिनलंडने सलग सातव्या वर्षी जगातील सर्वांत आनंदी देशाचा मान पटकावला आहे. त्यानंतर डेन्मार्क, आइसलँड व स्वीडन यांचा क्रमांक लागतो. इस्रायलनेही क्रमवारीत पहिल्या पाचमध्ये स्थान मिळविले आहे. काँगो, सिएरा लिओन, लेसोथो व लेबनॉननंतर अफगाणिस्तानला सर्वांत कमी आनंदी देश मानला गेले आहे. २०२० मध्ये तालिबान पुन्हा सत्तेवर आल्यापासून सतत संकटांचा सामना करणाऱ्या अफगाणिस्तानला सर्वेक्षणातील १४३ देशांच्या यादीत अगदी तळाशी स्थान मिळाले आहे. तर कोस्टा रिका व कुवेत यांनी अग्रस्थानावरील २० आनंदी देशांच्या यादीत १२ वा व १३ वा क्रमांक पटकावला आहे. दशकात पहिल्यांदाच अग्र क्रमांकावरील २० आनंदी देशांच्या यादीतून युनायटेड स्टेट्स व जर्मनी या क्रमवारीतून घसरले आहे. युनायटेड स्टेट्स गेल्या वर्षी १६ व्या स्थानावर होता; पण यंदा त्याची २३ व्या स्थानावर व जर्मनीची २४ व्या स्थानावर घसरण झाली आहे. कॅनडा १५ व्या, यूके २० व्या व फ्रान्स २७ व्या स्थानी आहे. मध्यपूर्वेतील देशांमध्ये यूएई २२ व्या व सौदी अरेबिया २८ व्या स्थानी आहे. आशियाई देशांमध्ये सिंगापूर ३० व्या स्थानावर; तर जपान ५० व्या व दक्षिण कोरिया ५१ व्या स्थानावर आहे. अहवालानुसार, भारतीयांपेक्षा चीन आणि पाकिस्तानातील लोक जास्त आनंदी असल्याचे दिसून येते कारण आनंदी देशाच्या अहवालात, भारत १२६व्या स्थानी आहे तर चीन ६०व्या, पाकिस्तान १०८व्या स्थानी आहे. तसेच नेपाळ ९३व्या, म्यानमार ११८व्या, श्रीलंका १२८व्या आणि बांगलादेश १२९व्या स्थानावर आहे. १५ दशलक्षांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नेदरलँड्स व ऑस्ट्रेलियाचा समावेश अवल्ल १० मध्ये झाला आहे; तर ३० दशलक्षांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या कॅनडा व यूके या देशांचा सर्वोच्च २० आनंदी देशांमध्ये समावेश झाला आहे. पण, या देशांचा अपवाद वगळता, सर्वांत आनंदी देशांच्या यादीमध्ये जगातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेल्या देशांचा समावेश नसल्याचे अहवालात दिसून आले आहे. २००६-२०१० पासून आनंदाच्या पातळीत लक्षणीय बदल दिसून आले आहेत. अफगाणिस्तान, लेबनॉन व जॉर्डन या देशांच्या आनंदाच्या पातळीत लक्षणीय घट झाली आहे; तर सर्बिया, बल्गेरिया व लाटव्हिया यांसारख्या पूर्व युरोपीय देशांच्या आनंदाच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन्स नेटवर्कद्वारे दरवर्षी जागतिक आनंदाचा अहवाल प्रकाशित केला जातो. या अहवालात दरडोई उत्पन्न, निरोगी आयुर्मान, विश्वास ठेवण्यासारखे कोणीतरी असणे, जीवननिवडीचे स्वातंत्र्य, दयाळूपणा व भ्रष्टाचार नसणे या सहा घटकांचा विचार केला जातो. २०२१-२३ कालावधीसाठी 'गॅलप पोल'द्वारे गोळा केलेल्या माहितीच्या आधारे सरासरी जीवन मूल्यमापन करण्यात आले आहे.

# औरंग्यासोबत पंतप्रधानाची तुलना करणं अपमानजनक

आधुनिक केसरी



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

**आदी होता वाघ्या, दैवयोगे झाला पाग्या, मुळ स्वभाव जाईना अशीच काही अवस्था उबाठाचे प्रवक्ते संजय राऊतांची झाली म्हणावी लागेल. हा माणुस केवळ प्रसिद्धीसाठी नको त्या शब्दांत बडबड करताना देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी ज्यांना विश्वगुरू म्हणुन ओळखल्या जाते. त्यांची तुलना क्रूरकर्मा औरंग्यासोबत करणं खरं तर हा भारतीय भावनेचा अपमान केल्यासारखंच म्हणावे लागेल. संत तुकाराम महाराज अभंगवाणीतून सांगुन गेले, आयुष्य जगताना इंद्रियाला पडलेले वळण तो इंद्रिय मुळात सोडतच नाही. जसं की बासुंदीचा बेत कुत्र्याला दिल्यानंतर रस्त्यावर पडलेले हाडुक चगळल्याशिवाय रहात नाही.**


कारण हाडुक चघळणं त्याचा मुळ स्वभाव तसंच काही ज्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची संस्कृती खालच्या पातळीवर जावुन रसातळाला घातली. अशा उलट्या खोपडीच्या माणसाला म्हणावं तरी काय? २०१९ नंतर महाराष्ट्राचं वैचारिक राजकारण ज्यांनी रसातळाला नेवुन टाकले. त्या उबाठाचे विश्व प्रवक्ते संजय राऊत यांचा मुळ स्वभाव जाता जाईना. हे अगदी खरंच आहे जे की संत तुकाराम महाराजांनी देखील सांगुन ठेवले की इंद्रियाला पडलेले वळण स्वभावातुन जात नाही. कंगना राणावतसारख्या महिलेचा हरामखोर म्हणून उल्लेख करणारे महाशय, खा. नवनित राणाला खालच्या पातळीवर जावुन आरोप करणारे महाशय, ज्यांना महिलेचा सन्मान देखील राखता आला नाही हे महाराष्ट्राने पाहिलं. यशवंतराव चव्हाणांचा महाराष्ट्र म्हणुन सांगितल्या जातं पण ज्या राऊतांनी राजकारणाची वैचारिकता संपवुन टाकली ते केवळ आत्म प्रसिद्धी मिळावी या लालसेपोटी. बेधडक, बेताल आरोप करणारी त्यांची प्रवृत्ती ज्याचं उत्तर देण्यासाठी भाजप नेत्यांना देखील वेळ नाही. कधी कधी लक्षात येतं की, मातोश्रीची वाट सर्वात जास्त कोण लावली असेल तर हेच महाशय ज्यांनी आज देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची तुलना औरंगजेब यांच्यासोबत केली. जाहिर भाषण करताना मी कसा वेगळा आहे? शिल्लक राहिलेली शिवसेना केवळ माझ्यामुळेच तरून कशी जाते? हे दाखवताना देशाचं राजकारण ज्यांच्याभोवती फिरतं, त्या पंतप्रधान पदाच्याच नेतृत्वावर थेट हल्ला चढवायचा ज्यामुळे आपला चेहरा घरोघरी जावुन पोहोचतो हा आविर्भाव ज्यांच्या मनात मानसिक संतुलन बिघडल्यासारखं म्हणुन त्यांनी खऱ्या अर्थाने राजकिय संस्कृतीच बिघडवुन टाकली. पाच वर्षापासुन रोज टिव्हीवर सकाळी ९ वाजता हा चेहरा पहाण्याचा वीट खरं तर लोकांना आला. त्याहुन अधिक सांगायचं झालं तर लहान लेकरू रडायला लागलं तर आई त्याला सांगते, चुप बैठ संजय राऊत वो देख टिव्हीपे बडबड कर रहा है. एवढं किळसवाणी त्यांच्याविषयीचं मत लहान थोरात देखील होवुन बसलं. पण यांना त्याचं काही वाटत नाही. कारण एक विचारवंत सुज्ञ संपादक एकेकाळी होते. ज्यांच्या लेखणीतुन जागृती व्हायची. पण आदी होता वाघ्या, दैवयोगे झाला पाग्या, मुळ स्वभाव जाईना, येळकोट येळकोट राहीना, असंच काही त्यांच्या बाबतीत होवुन बसलं. एक तर मुळ शिवसेनेची सर्वात वाट त्यांनी लावली. स्व. बाळासाहेब ठाकरेंनी हिंदुत्वाचं स्वप्न पाहिलं. वर्तमान व्यवस्थेत खरं तर साकार होत आहे पण अशा माणसांनी मातोश्रीतुनच हिंदुत्वाचा कडेलोट करून समुद्रात बुडवुन टाकलं आणि आता शिल्लक राहिलेल्या उबाठाला केवळ मताचं लांगुनचालन करत धर्मनिरपेक्षवाद्यांच्या पंक्तीला जावुन बसले. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाचा अमृतकाळ, पण वर्तमान म्हाराष्ट्राच्या राजकारणात शकुनी मामाच्या भुमिकेत काम करणाऱ्या संजयाच्या दृष्टीला हे चांगलं कधी दिसणार? हाच प्रश्न पडतो. औरंगजेब क्रूरकर्मा ज्यांनी स्वतःच्या माता-पित्याचा, लेकराचा, भावाचा छळ करून शिरच्छेद केला. ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करताना छळलं, ज्या औरंग्याने संभाजी महाराजांना हलहल करून ठार मारले. त्याच्यासोबत भारतीय काही महाराष्ट्र म्हणजे अष्टीच हा त्यांच्या अंगी असलेला आविर्भाव अजुन शिल्लक राहिलेल्या पक्षाला गाडुन टाकण्यासारखाच म्हणावालागतो. उलट्या खोपडीचे माणसं कधी काय बोलतील? याचा नेम लागत नाही. १३८ कोटी जनतेच्यामनात मोदीजी यांचं नेतृत्व घर करून बसलेले आहे. संजय राऊत राज्यसभेवर खासदार झाले ते केवळमोदीरूपी मतदानामुळेच. खरं तर काही स्वाभिमान या माणसाला असेलना तर अगोदर राज्यसभा सदस्याचा राजीनामा



खरं तर राहुल गांधीला मातोश्रीनं पायघड्या घालणं निश्चित स्वर्गात स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या डोळ्यात आश्रु आले असतील. देशाचं पंतप्रधानपद लोकशाहीतील सर्वोच्च सन्मान, प्रतिष्ठा आपल्या देशात ओळखल्या जाते. या पदाची चेष्टा त्यांनी करणं खरं तर भारतीय भावनेचा अपमानच म्हणावा लागेल. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी मागच्या वीस वर्षांपासुन एकदाही सुट्टी न घेता मातृभुमीची सेवा करताना जगाच्या पाठीवर देशाची प्रतिष्ठा वाढवुन दाखवली. स्वातंत्र्यानंतर भारत हा देश कोणत्या काळात सर्वांग विकसित आणि समृद्ध सामर्थ्यवान म्हणुन ओळखल्या जातो तो हाच काळ. २०१४ ते २०२४ ज्या काळात राम मंदिराचा प्रश्न निकाली निघाला, काश्मिरमधील ३७० कलम काढुन टाकण्यात आले. सीएए सारखा कायदा ज्यामुळे निर्वासित हिंदु बांधवांना नागरिकत्व मिळु शकते. विकास काय असतो? हा सांगणारा काळ म्हणजे पंतप्रधानाची ज्यांची ओळख विश्वगुरू म्हणुन जगाच्या पाठीवर आहे तुलना करणं म्हणजे महामुर्खपणाचा कळस गाठणं म्हणावे लागेल. खरं तर केंद्र सरकारने गुजरातपेक्षा सर्वाधिक विकास निधी महाराष्ट्रामदिला. जे कधी आजवरच्या इतिहासात घडलंच नाही. पण संजय राऊत जणुकाही महाराष्ट्र आपल्या बाची जहाब्रीआहे, नव्हे तर आपल्या सात-बारावरच लिहुन ठेवलेली आहे की काय या तोऱ्यात बोलतात. हा महराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेला रयतेचा राजाचा महाराष्ट्र होय. स्त्रबाळासाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्र होय. पण तो अधिकार आता उबाठाने गमावुन ठेवला. कारण महाराष्ट्रचा स्वाभिमान काँग्रेसच्या दरबारात गहाण ठेवला तो केवळ आपल्या राजकिय स्वार्थापोटी. एवढी वाताहत हा असताना, महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला कधीच झिडकारून टाकलं असताना जणु द्यायला हवं मग नाक उंचुन बोलायला हवं. पण जो शकुनी संपुर्ण महाभारत ज्याच्यामुळे घलं, तो आपल्या भाच्याची पुर्णतः वाट लावल्याशिवाय शांत राहिला नाही. तसं आता शकुनीच्या भुमिकेत साम राऊत काम करताना दिसतात. उद्याच्या लोकसभा निवडणुकीत एकही खासदार निवडुन येणार नाही याची खात्री त्यांनाच आहे. शिवाय देशात ४०० पार मोदी सरकार आश्वारूढ होणार हे देखील भविष्य संपादकता चांगलं माहिती आहे. कदाचित संभाव्य राजकारण आणि भविष्य ओळखुन मानसिकता हळुहळु ढासाळल्यासाखी असुन मुळ स्वभाव फालतु बडबडीचा असल्याने आणि आता प्रसिद्धीची हाव जास्त वाढल्याने थेट पंतप्रधानावरच बोलुन जायचं पण खऱ्या अर्थाने हे तर आता नुसत्या संजय राऊतांना नाही तर शिल्लक रहिलेल्या उबाठा पक्षाला महागात पडेल. लोकसभा निवडणुकीनंतर यांनाच मातोश्रीला येण्यासाठी ब्रेक लगु नये याची चिंता वाटते.

# जागतिक जल दिन

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२१५

**आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला.**

ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल



असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मविप्र सेवानिवृत्त सेवकांची मोफत वैद्यकीय तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वाटचालीत सेवकांचेही मोठे योगदान असते त्यामुळे त्यांची कृतज्ञता म्हणून डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व मविप्र रुग्णालय यांच्यावतीने सेवानिवृत्त सेवकांचा आरोग्य तपासणीचा उपक्रम सुरू असल्याचे प्रतिपादन सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी व्यक्त केले. आडगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ.वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व मविप्र रुग्णालय आणि नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक निवृत्त सेवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त सेवकांची विनामूल्य आरोग्य तपासणी करण्यात आली, या कार्यक्रमाप्रसंगी सेवानिवृत्त सेवकांशी संवाद साधताना ॲड. नितीन ठाकरे हे बोलत होते. कोविडच्या जागतिक महामारीनंतर सेवानिवृत्त सेवकांची वैद्यकीय तपासणी झाली नव्हती, हा उपक्रम संस्थेने पुन्हा सुरू केला असून सेवानिवृत्त सेवक संघाच्या सभासदांना जास्तीत जास्त वैद्यकीय सेवा, सुविधा ह्या सवलतीच्या दरात पुरवल्या जातील, असे यावेळी ॲड.ठाकरे यांनी सांगितले

मविप्र कार्यकारी मंडळाच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, निवृत्त सेवक संघाचे अध्यक्ष यु. आर जाधव, उपाध्यक्ष एस. आर. पगार, सचिव माणिकराव गोडसे, सहसचिव एल. एस. तिडके व पदाधिकारी उपस्थित होते. या शिबिरात 154 सेवानिवृत्त सेवकांची तपासणी करण्यात आली. तसेच रक्त, लघवी, मधुमेह, रक्तदाब, एक्स-रे, इसीजी अश्या एकूण दहा तपासण्या विनामूल्य करण्यात आल्या. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, उप वैद्यकीय अधीक्षक डॉ. कल्पना देवणे, कम्युनिटी मेडिसिन विभागाचे प्रमुख डॉ. बालाजी आलमले, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते प्रवीण वाघ,महेश बेंडकुळे, वृषाली वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले.




# सर्वसामान्य कुटुंबातील खुदेजा बनली ग्राम महसूल अधिकारी व पोलीस उपनिरीक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** अंगी जिद्द, चिकाटी व अभ्यासात सातत्य असले तर आकाशात गरुड भरारी घेता येते, हे देवगाव (ता.निफाड) येथील खुदेजा अशपाक शेख हिने आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले. ती तलाठी सरळसेवा पदभरती परीक्षेत २०० पैकी १८५.७७ गुण मिळवुन उत्तीर्ण झाली असुन तिची ग्राम महसूल अधिकारी तलाठी म्हणून निवड झाली आहे. खुदेजा शेख सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी असल्याने व्यवस्थेच्या निम्नस्तरापासून ते उच्चस्तरापर्यंत विविध कामांसाठी सर्वसामान्य नागरिकांचा संघर्ष तीने जवळून पाहिला आहे. त्यामुळे तिला अधिकारी होण्याचे स्वप्न खुणावत होते. खुदेजाचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद शाळेत झाले. पुढे तिने श्री.डी.आर.भोसले विद्यालयात माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतले. नंतर नाशिक येथे मविप्र समाजाचे के.डी.एस.पी.कृषी महाविद्यालय बीएससी एग्रीकल्चर पदवी मिळवली. खुदेजाला खासगी कंपनीत नोकरीची संधी मिळत होती, पण शिक्षणाची आणि अभ्यासाची आवड असल्याने तीने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारीपद मिळवून समाजसेवेचा संकल्प केला. सन २०२२ ला पोलिस उपनिरीक्षक पदासाठी शारीरिक चाचणीसाठी ४०० पैकी ३१० गुण मिळवुन ती पात्र झाली असून प्रशिक्षण बाकी आहे. यासह मंत्रायलयात सहायक कक्ष अधिकारी सन २०२३ पदाची मुख्य परीक्षा दिली असून निकाल अद्याप बाकी आहे.

मी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास नीट समजून घेत, अभ्यासासाठी वेळेचे व्यवस्थित नियोजन केले . आठ ते दहा तास अभ्यास करण्याची तयारी ठेवली . माझ्या यशामध्ये माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य व शिक्षकांचा मोठा वाटा आहे . स्पर्धा परिक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी जिद्द, सातत्य, चिकाटी व प्रयत्न गरजेचे असते .



–**खुदेजा शेख**

# विनयभंग: आरोपीला तीन वर्षांची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** मुलीचा विनयभंग केल्या प्रकरणी आरोपीला अलिबाग जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. केवीन सतिश म्हात्रे असे शिक्षा सुनीवण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सदरचा गुन्हा अलिबाग तालुक्तील किहीम २२ डिसेंबर २०२१ रोजी घडला होता. पिडीत मुलगी तिच्या मैत्रिणी समवेत शाळेतून घरी चालली होती. यावेळी आरोपी केवीन म्हात्रे तिथे मोटरसायकल घेऊन आला आणि मुलींसमोर विकृत चाळे करू लागला. १८ जानेवारी २०२२ आणि २१ जानेवारी २०२२ ला पुन्हा त्याने पिडीत आणि मैत्रिणींसमोर विकृत चाळे केले. अश्लील अंगविक्षेप केले. त्यानंतर पिडीतेचा विनयभंग केला. त्यामुळे २८ जानेवारी २०२२ रोजी फिर्याद मांडवा सागरी पोलीस ठाण्यात नोंदवली. त्यानुसार आरोपी केवीन सतिश म्हात्रे याच्या विरोधात भा. द. वि. सं. कलम ३५ ४ अ(१) तसेच पोक्सो कायदा कलम ७.८.११ या कलमां आंतर्गत गुन्हा दाखल केला होता या प्रकरणाची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या न्यायालयात झाली. सदर खटल्यात विशेष शासकीय अभियोक्ता म्हणून ॲड. स्मिता धुमाळ-पाटील यांनी काम पाहीले. सुनावणी दरम्यान १३ जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. यात फिर्यादी मुलगी, पिडीत साक्षीदार मुलगी, तपासिक अंमलदार, नायब तहसिलदार अजित टोळकर, महिला पोलीस निरीक्षक डी. पी. खाडे यांच्या साक्षी महत्वपुर्ण ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारी अभियोक्ता स्मिता धुमाळ पाटील यांचा युक्तीवाद ग्राह्य धरला आणि आरोपी दोषी पकडून तीन वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा आणि सहा हजार रुपयांचा दंडही ठोठावला.



# चंद्रपूर जिल्ह्यात भूजल प्रदूषणात घट; नद्यांच्या प्रदूषणात वाढ

आधुनिक केसरी



२०२३ ह्या मागील वर्षात भूजल सर्वेक्षण विभागाने जिल्ह्यातील १५ तालुक्यात १७०१ गावापैकी १३३६ गावातील पाण्याचे नमुने गोळा करण्यात आली. त्यात १४४८१ जलस्त्रोतातील २०१३० नमुन्यांची तपासणी करण्यात आली. ह्या नमुन्यात १७३१७ नमुने पिण्यायोग्य तर २८१३ नमुने दूषित आणि पिण्यायोग्य नव्हती. म्हणजे ८६.०३ % नमुने चांगले तर १३.९७ % नमुने दूषित आणि पिण्यायोग्य नव्हते. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात कमी अधिक प्रमाणात फ्लुराईट ,नायट्रेट ,सलाइनिटी ,लोह आणि बेक्टेरिअल प्रदूषके आढळली. .एकूणच मागील १० वर्षाच्या तुलनेत भूजल प्रदूषण काही प्रमाणात कमी झालेले असले तरी नद्यांच्या प्रदूषणात वाढ झालेली आढळते. हे भूजल प्रदूषण असले तरी ज्या गावात पीन्याच्या पाण्यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था (एटीएम,नळ योजणा,इ.) केली असेल आणि ती सुरु असेल तर तिथे प्रदूषणामुळे लोकांना फारसा धोका संभवत नाही अशी माहिती पर्यावरण अभ्यासक आणि ग्रीन प्लानेट सोसायटीचे अध्यक्ष प्रा सुरेश चोपणे ह्यांनी दिली आहे.

**ल्ह्यातील प्रदूषित गावे/रहिवास क्षेत्र :** चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील ५९८ रहिवास क्षेत्रात पिण्याच्या भूजल नमुन्यात प्रदूषण आढळले,त्यात चंद्रपूर- तालुक्यात ३९ गावात , भद्रावती -३९ ,वरोरा -७२ ,चिमूर -३६ ,नागभीड-५२ ,ब्रम्हपुरी-७१ , मुल-४९ ,गोडपीपरी-२२ ,राजुरा -२९ ,सावली-६१ ,बल्लारपूर-०९ ,कोरपना-४१ ,सिंदेवाही-५३, पोमभुर्णा-१५ ,आणि जिवती तालुक्यातील १० गावातील नमुने प्रदूषित आढळले.

भूजल सर्वेक्षण विभागाच्या प्रदूषणाची जी मानके आहेत त्यानुसार खालील पैकी पाण्याची नमुने प्रदूषित आढळली असून पिण्यायोग्य नाहीत. इ.स २०२३-२४ मध्ये घेतलेल्या पिण्याच्या पाण्याच्या नमुन्याची ही आकडेवारी आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळ वर्षातून २ वेळा भूजल आणि जमिनीवरील जल स्त्रोतांचे प्रदूषण मोजते. त्यात १० किंवा अधिक मानके ( P.H,T.H,CH,MH,CLORIDE, TDS,FLUORIDE,NITRATE,SULPHATE) अभ्यासली जातात. शहराजवळून वाहणाऱ्या प्रदूषित आणि झरपट आणि इरई नद्यांच्या आणि अतिशय प्रदूषित रामाळा तलावामुळे शहराचे भूजल प्रदूषित झाले आहे.आधीच नैसर्गिक रित्या जमिनीत आढळणारे क्षार,चुना,कोळसा आणि फ्ळूराईट मुळे भूजल प्रदूषित आहे.जिल्ह्यातील भूजलात नायत्रेट,फ्लोराईड ,क्लोराईड,आयरन,पीयच,टीडीएस चे प्रमाण अधिक आहे. त्यात मानवी जीवनशैलीमुळे झालेल्या प्रदूषणाने भूजल सर्वाधिक प्रदूषित झालेले आहे.ह्या प्रदूषणामुळे रोगराईत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. २०२२-२०२३ वर्षात भूजल संवेक्षण विभागाने केलेल्या सर्वेत सुद्धा भूजल प्रदूषण तुलनेने कमी असल्याचे लक्षात येते मात्र नद्यांचे प्रदूषण वाढले आहे..

२०२२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणा नुसार वर्धा नदीचे पात्र पुलगाव ते राजुरा पर्यंत हे प्रदूषित मानले गेले आहे .चंद्रपूर जिल्ह्यात घुग्गुस ते राजुरा पर्यंतचे ४२ किमी पात्र हे प्रदुशीत श्रेणी ३ मध्ये समाविष्ट असून येथे BOD (BIOLOGICAL OXYGEN DEMAND) मापदंड मानली जातात. हे प्रमाण ११.४ तर पूर्वीच्या सर्वेक्षणात १२ ते ३० BOD आढळले होते .प्रदुशनासाठी PH,DO,BOD,FC,TC मानके गृहीत धरतात. ह्या प्रदूषणाला वरोरा,भद्रावती,राजुरा बल्लारशा आणि चंद्रपूर शहरातील सांडपाणी ,वेकोली च्या खाणी आणि जवळ जवळ ४० उद्योगातून काही प्रमाणांत होणारा विसर्ग कारणीभूत आहे. ,त्यांना ETP यंत्रणा असूनही अनेकदा दूषित पाणी नदीत सोडले जाते. ह्या क्षेत्रात नागरिकांना ६०० MLD पाणी लागते त्यातून ३०० द.ल.घ.मी सांडपाणी निघते. चंद्रपूर मधून ४०-५० MLD सांडपाणी तर इतर तालुक्यातून जवळ जवळ १५ MLD सांडपाणी नदीत सोडले जाते. त्यातील केवळ ४० MLD सांडपाणी चंद्रपूर मध्ये स्वच्छ केले जाते,बल्लारशा येथे प्रस्तावित १६ MLD यंत्रणा अजूनही कार्यान्वित नाही. चंद्रपूर येथे पाठानपुरा,रहमत नगर आणि आझाद गार्डन येथे ७०.५ क्षमतेच्या STP आहे परंतु अजूनही शहरातील नाल्या जोडल्या गेल्या नाही.अलीकडे थर्मल पॉवर स्टेशनसाठी सांडपणी शुद्ध करून वाहून नेण्याचे काम सुरु आहे. इतर तालुक्यातील पालिकांना पाणी स्वच्छता यंत्रणा कायद्याने आवश्यक असूनही अजून लावल्या गेल्या नाहीत. न्यायालयाचे आदेश असताना सुद्धा सर्व पालिकांचे प्रदूषित पाणी सरळ नदीत सोडले जाते. (प्र.नि.मंडळाने घुग्गुस,वढा,हडस्ती,राजुरा पूल,चंद्रपूर MIDC,ताडाली,इराई,झरपट ह्या सर्व ठिकाणाचे नमुने तपासले असून ते सर्व प्रदूषित (NON COMPLYING) आढळले .त्यामुळेच जिल्ह्यातील ४ ओद्योगिक क्षेत्रातील सर्व उदोगाना उपाय योजना आणि सुधारणा करण्यास चंद्रपूर जिल्ह्याच्या पाश्चिम-दक्षिण सीमेवरून पैनगंगा नदी वाहते आणि ती वढा येथे वर्धेला मिळते.वर्गवारी ४ मध्ये मोडणारी ही नदी जरी मेहकर-उमरखेड येथे जास्त प्रदूषित दाखविण्यात आली असली तरी वढा येथे घेतलेया नमुन्यात ती प्रदूषित दाखविण्यात आली आहे.वैनगंगा नदी चंद्रपूर जिल्ह्याच्या पूर्व-उत्तर दिशेला वाहत असून ती वर्ग ३ मध्ये तुमसर ते अंभोरा पट्यात प्रदूषित दाखविण्यात आली आहे. परंतु तरीही ती चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेवर कमी अधिक प्रमाणात प्रदूषित आहे.त्यामुळे ह्या नद्यांना सुधा हाच अक्शन प्लान लागू आहे.

**इरई-झरपट नद्यांचा अक्शन प्लान कागदावरच**

इरई आणि झरपट नद्या ह्या जणू गटार वाहून नेणारे नाले झाले आहेत.आपल्या सर्वाच्या तक्रारीनंतर १० वर्षादरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाने इरई-झरपट साठी '' अँक्शन प्लान'' बनविला होता .तेव्हा पासून थोड्या प्रमाणात उपाय योजना झाल्या,मात्र प्रदूषण वाढतच चालले आहे. इरई नदी ही वर्धा नदीची उपनदी असून ती चिमूर तालुक्यातून निघून हडस्ती गावाजवळ वर्धा नदीला ७८ किमीचा प्रवास करून मिळते. चारगाव आणि चंदइ धरणा पासून तर संगमा पर्यंत ८३ गावे नदीजवळ आहेत.तर धरणापासून संगमापर्यंत १९ गावे आहेत. ह्याचे नदीत येणारे दूषित पाणी,त्यात सर्वाधिक सांडपाणी चंद्रपूर शहराचे आहे. किटाळी-भटाली,दुर्गापूर,पद्मापूर कोळसा खाणी पासून नदी प्रदूषित होत आहे .त्यात मोठा वाटा थर्मल पॉवर स्टेशन चा आहे.पुढे लालपेठ, माना परिसरातील सर्व खाणीचे ,ओव्हर बर्डन चे प्रदूषण, दाताळा परिसरातील उद्योग ह्याचे प्रदूषणाचा समावेश आहे.ह्या खाणीचे प्रदूषित पाणी साठी ३० BOD MG/L परवानगी असताना दूषित पान्यात BOD प्रमाण ४०.५९ ते १४२.५ पर्यंत आढळले.

इरई-झरपट नदीच्या स्वच्छतेसाठी काही नागरिक न्यायालयात गेले आहेत.२०२२ मध्ये महाराष्ट्रातील नद्यांची स्वच्छता करण्यासाठी .''चला जानुया नदीला ''ही भव्य दिव्य योजना आखली गेली,भव्य यात्रा ,प्रसिद्धी झाली परंतु विशेष प्रगती झाली नाही,चंद्रपूर मध्ये ह्या योजनेत इरई आणि उमा नद्यांचा ह्यात समावेश आहे. ग्रीन प्लानेट सोसायटी संस्थेने इरई नदीचा उगम ते संगम अभ्यास करून नदी संवर्धनाचा आराखडा मध्ये जिल्हा प्रशासनाला सप्टेंबर २०२३ ला सादर केला आहे.

**इरई - झरपट नदी अँक्शन प्लान :** हा कृती आराखडा काही वर्षापूर्वीचा असला तरी तो आजही पूर्ण केला गेला नाही,परंतु आजही काही फरकाने तो लागू पडतो.ह्यात खालील उपाय योजना सुचविल्या आहेत.

१) दोन्ही नद्यांतील एकोर्निया आणि जलीय वनस्पती काढणे २) नदी जवळील अतिक्रमण काढणे,नदीत आंघोळ,कपडे,वाहने धुण्यास मनाई करणे ३) नदीत कचरा जावू नये म्हणून नदीकिनारी भिंती बांधणे ४) झोपडपट्टीत शौचालये बांधणे,सांडपाणी शुद्धीकरण यंत्रणा लावणे.५) नद्यांच्या तीरावर वृक्षारोपण,सौन्दर्यीकरण करणे.रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे ६) पावसाळ्या पूर्वी नद्यांचा गाळ-कचरा साफ करणे.

८) जिल्हा परिषदेच्या,सिंचन विभाग,कृषी विभागातर्फे जनजागरण मोहीम राबवविणे

९) ग्राम पंचायत-ग्रामपंचायत तर्फे गावातून सांडपाणी,कचरा सोडणार नसल्याचे तसेच सुलभ शौचालय बांधण्यासाठी ठराव घेणे, शोष खड्डे बांधणे,त्यासाठी शासनाने साहित्य पुरविने इ.

जल प्रदूषनाचे आरोग्यावर घातक परिणाम आणि उपाय

सांडपाणीयुक्त पाणी आणि इतर जल प्रदूषणाचे अनेक गंभीर परिणाम होतात. जास्त गाळ आणि खनिजे असलेल्या पाण्यामुळे किडनीत आणि पित्ताशयात खडे,रसायनामुळे रक्त आणि अवयवात बिघाड, रोगजंन्तुमुळे कॉलरा, डायरिया, डीसेंट्री, हिपाटीसीस, टायफोईड, गेस्ट्रो, कावीळ तसेच जीवाणू/विषाणूचे इतर आजार होतात.ह्यावर उपाय म्हणजे जास्त प्रदूषण असलेल्या ठिकाणाचे पाणी उकळून प्यावे तसेच शुद्ध करूनच प्यावे.शासनाने अलीकडे वॉटर एटीयम आणि फिल्टर प्लांट लावले असले तरी त्यातील अनेक बंद असल्याचे आढळतात,ते शासनाने सतत सुरु ठेवले पाहिजे.चंद्रपूर जिल्ह्यात नैसर्गिक प्रदूषके सुद्धा आहेत,त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागात शुद्ध पाणीच पिले पाहिजे आणि ती पुरविणे ही शासनाची जिम्मेदारी आहे.

प्रा सुरेश चोपणे
पर्यावरण अभ्यासक

# गोवंश जगवायला हवा !

आधुनिक केसरी



जगन घाणेकर
मो. ९६६४५५९७८०

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या वतीने गोवर्धन गोवंश समिती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ साठी पात्र असलेल्या महाराष्ट्रातील १७८ गोशाळांना एकूण २२ कोटी ८३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गोशाळा सक्षम करुन अधिकाधिक संपन्न करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्वाचे असल्याचे सांगितले जात आहे. राज्यातील ४० गोशाळांना प्रत्येकी १५ लाख रुपये, ५३ गोशाळांना प्रत्येकी २० लाख रुपये आणि ८५ गोशाळांना प्रत्येकी २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान केवळ नोंदणीकृत गोशाळांना देण्यात येणार असून राज्यात आज जवळपास ११०० हुन अधिक गोशाळा आहेत त्यामुळे बाकीच्या गोशाळांचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन कोणत्या ना कोणत्या वृत्तपत्रात वाचायला मिळतात. ज्या पद्धतीने या गाड्यांमध्ये गोवंश भरलेले असतात ते पाहिल्यावर कोणत्याही हिंदूंच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. गाड्यांमध्ये अत्यंत निर्दयपणे कोंबून भरलेल्या गोवंशांपैकी काही गोवंश तर प्रवासातच मृत पावतात. हे सर्व पाहिल्यावर राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही ? राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू होऊन आज ९ वर्षे झाली. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असला तरी गोहत्या थांबलेल्या नाहीत. अनेक ठिकाणी प्रतिदिन गोवंश कापले जातात. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय.

भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. राज्याच्या अनेक भागांत दुष्काळी परिस्थितीमुळे फार मोठे संकट ओढवले आहे. शेतकऱ्यांच्या रोजच्या अन्न पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे



तिथे घरच्या गोधनाला चारा कुठून देणार ? पुरेसा चारा मिळत नसल्याने गाई दूध देत नाहीत. मायेने पाळलेल्या गोधनाचे आपल्या डोळ्यासमोर हाल नको म्हणून अनेक गरीब शेतकरी आपले घरचे गोधन कसायांना विकत आहेत. गोरक्षक आणि पोलीस माहिती मिळताच जीवावर उदार होऊन गोवंश घेऊन जाणाऱ्या गाड्या पकडतात आणि सुटका केलेल्या गोवंशांना जवळच्या गोशाळांत सोडतात. ग्रामीण भागातील गोशाळांमध्ये अशा प्रकारे सोडलेल्या गाईंमध्ये अनेक गाई या भाकड असतात. त्यामुळे गोशाळांना दूध अथवा दुग्धजन्य उत्पादनातून तितकेसे उत्पन्नही मिळत नाही. तरीही गोपालक गोशाळांमध्ये त्यांची प्रेमाने जपणूक करतात. त्यांच्या औषध पाण्यावर खर्च करतात. राज्यात ओढवलेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळेतील शेकडो गोवंशाच्या रोजच्या चारापाण्याचा खर्च भागवणे गोशाळा चालवणाऱ्यांनाही आता अवघड होत चालले झाले आहे. सरकारी अनुदान प्राप्त गोशाळांपेक्षा विनाअनुदानित गोशाळांची संख्या अधिक असल्याने अशा गोशाळा चालवण्यासाठी सर्वस्वी समाजातील देणगीदारांवर अवलंबून राहावे लागते. गोशाळांतील वाढते गोधन आणि मिळणाऱ्या मर्यादित देणग्या यांमुळे गोशाळा चालवणाऱ्या अनेक गोपालकांवर आज आर्थिक संकट ओढवले आहे. कसायांकडून अशा गोशाळांना संपर्क करून गोवंशाची मागणी केली जाते; मात्र आज काही असेही गोपालक आहेत ज्यांनी गोशाळा चालवण्यासाठी स्वतःचे घरदार विकले आहे; मात्र एकही गोवंश कसायापर्यंत जाऊ दिलेला नाही. गोशाळेतील गोवंश जगवायचे असतील, तर केवळ सरकारवर अवलंबून राहणे चालणार नाही. त्यासाठी समाजातील सधन मंडळींनी पुढे यायला हवे. आपल्या ऐपतीनुसार गोवंशाच्या काही दिवसांचा खर्च भागेल असे अर्पण द्यायला हवे. कसायाच्या तावडीतून केवळ गोधन वाचवून चालणार नाही तर ते वाचवलेले गोधन जगवायची जबाबदारीही आपलीच आहे हे जाणून गोशाळांना शक्य तितके अर्थ साहाय्य करायला हवे !

# गिरिजापात्रात वाळू माफियांचा रात्री वाळू उपसा करण्यासाठी धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील भालगाव, कविटखेडा, वडोद बाजार,वडोद खुर्दवाडी, शेवता, जळगाव मेटे, पेंडगाव,पाडोळी,गणपती बोरगाव ह्या परिसरामध्ये गिरजा नदीपात्रामध्ये वाळू माफियांचा वाळू उपसा करण्यासाठी रात्रीच्या वेळी धुमाकूळ सुरू राहतो व शासनाचे लाखो रुपयाचे महसूल चोरी होत असून गिरजा नदीपात्रामध्ये एक एक ते दोन-दोन पुरुसाचे खोल खड्डे पडलेले आहेत पोलीस प्रशासन तहसीलचे नेमलेले पथक कुठलीही कारवाई करत नसून वाळू माफियांचे अच्छे दिन आलेले आहे. शेतकऱ्याचे वाळू उपसा केल्यामुळे विहिरीचे पाण्याची पातळी खोल गेली असून परिसरामध्ये पाण्याची टंचाई समस्या निर्माण होणार असून वाळू माफिया



गिरिजा नदीपात्रामध्ये एक एक ते दोन–दोन पुरुसाचे खोल खड्डे पडलेले आहेत पोलीस प्रशासन तहसीलचे नेमलेले पथक कुठलीही कारवाई करत नसून वाळू माफियांचे अच्छे दिन आलेले आहे . गिरिजा नदीपात्रातून वाळूजची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी . **हेमंत वाघ, रयत शेतकरी संघटना, तालुकाध्यक्ष फुलंब्री**

रात्रीच्या नऊ वाजेपासून तर सकाळी सहा वाजेपर्यंत बिनधास्तपणे ट्रॅक्टरच्या टिप्परच्या हायवा यांच्या साह्याने गिरजा नदीपात्रामधून रात्रीच्या वेळी बिनधास्तपणे अवैध वाळू उपसा करत आहे संबंधित तहसीलदार नेमलेले पथक कुठलीही कारवाई करत नसून वाळू माफिया रात्रीच्या वेळी गिरजा नदीपात्रामध्ये वाळू माफियांचा धुमाकूळ व पोळा फुटत आहे. वाळू माफियांचे व तहसीलदार यांनी नेमलेले पथक यांचे धाबे दणाणले आहे की काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. त्याकरता वरिष्ठ जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी दखल घेऊन जरी वाळूमाफिया यांच्या ट्रॅक्टरवर व हायवावर अवैध रीतीने वाळू उपसा करणाऱ्या वर कारवाई करण्याची शेतकऱ्याकडून मागणी होत आहे.

# मृत्यूस कारणीभूत प्रकरणी आरोपीस दंडाची शिक्षा

## लोहा न्यायालयाचा निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जीप चालकाने स्वतःच्या ताब्यातील जीप निष्काळजी व हायगायपणे चालवून एकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी लोहा प्रथम वर्ग श्रेणी न्यायालयाने सात वर्षानंतर चालकास चार हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. लोहा प्रथम श्रेणी न्यायालय येथे दाखल खटल्याची सुनावणी नुकतीच झाली त्यामध्ये आरोपीस साक्षी पुराव्याच्या आधारे दोषी ठरविण्यात आले. वहाद ता. कंधार येथील व-हाडी मंडळी दि. १५ मे २०१६ रोजी लग्नाचा कार्यक्रम आटोपून जीप क्र. एम एच २४ एफ ३५६३ ने दुपारी गंगाखेड लोहा रस्त्याने वहाद कडे जात असताना सुनेगाव जवळील पेट्रोल पंपाच्या नजीक जीप चालक शंकर सीताराम मुकनर याने स्वतःच्या ताब्यातील जीप हायगय व निष्काळजीपणे चालवली तसेच चालकाचे जीप वरील नियंत्रण सुटल्याने जीप रस्त्यालगत झाडाला धडक देवून उलटली. जीप मधील प्रवाशी जखमी झाले होते तर नामदेव गुंडेराव जाधव यांचा मृत्यू झाला होता. मयताच्या भावाने लोहा पोलिसात चालकाविरुद्ध दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदरील खटला लोहा न्यायालयात सुरू होता. तब्बल सात वर्षानंतर सदर खटल्याचा निकाल लागला. प्रथम वर्ग न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. एस. गायकवाड यांनी संपूर्ण घटनेतील सक्षिदारांची साक्षी पुरावे तपासून आरोपीस दोषी ठरवून चार हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सदरील घटने प्रकरणी पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे यांनी तपास करून न्यायालयास दोषारोपपत्र सदर केले. तर सरकार पक्षातर्फे ॲड. श्रीकांत भोजणे यांनी काम पाहिले. तर पैरवी अधिकारी म्हणून पोहेकॉ यु. एन. घुगे यांनी काम पाहिले.

# राज साहेब.. हे वागणं बरं नव्हं म्हणत.. राज साहेब तुम्ही पण.. पत्र समाज माध्यमावर व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** एरव्ही एकमेकांना शिव्या घालणारे, लाखोली



वाहणारे, एकमेकांचे वाभाडे काढणारे राजकारणी पुढारी मंडळी आजघडीला लोकसभा निवडणूक २०२४ च्या तोंडावर "तुझा गळा.. माझा गळा गुंफू मोत्याच्या माळा" म्हणत पराकोटीला गेलेले राजकीय वैर, संघर्ष विसरून राजकारणाच्या आखाड्यात एकमेकांसोबत युती, आघाडी करत आसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. त्याच अनुषंगाने एक पोस्ट समाज माध्यमावर व्हायरल होताना दिसत आहे त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, राज साहेब तुम्हीपण.. राज साहेब हे वागणं बरं नव्हं.. म्हणत 'महाराष्ट्राचा ब्लू प्रिंट' नकाशा अमित शहा यांच्या हाती देवून गुजरात पॅटर्न शी युती केलात असे नमूद केले आहे.

अनेक राजकीय पुढा-यांची हुबेहुब नक्कल करुन आपल्या उत्तम घणाघाती वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असणा-या मनसे प्रमुख राज ठाकरे यांना पण आता जनता म्हणते, राज साहेब तुम्ही पण.... ! २०१२ मध्ये नाशिक महापालिकेत व मुंबई महापालिकेत आपल्या भाषणाच्या व नकलांच्या जोरावर राज ठाकरे यांनी सत्ता आणली होती. परंतु पुढे ज्यांची नक्कल केली त्यांच्याशीच सत्ता मिळवण्यासाठी, टिकविण्यासाठी हात मिळवणी केली. ही राज ठाकरेंची नक्कल मुंबई व नाशिककरांना चांगलीच माहिती आहे. परंतु बिच्या-या महाराष्ट्रातील जनतेला प्रश्न पडलाय..?

अहो, राजसाहेब..! केवळ एकाच लोकसभेच्या जागेसाठी हे वागणं बर नव्ह..! अहो राजे, गावात होईल सभा हे वागणं बरं नव्हं..! एरव्ही राज साहेबांनी मुंबईतील मराठी माणसांच्या शोषणाचा प्रश्न प्रभावी भाषण शैलीतून आवाज उठवला. पण आता महाराष्ट्राच्या विकासाची स्वप्न पहाणा-या राज साहेबांनी 'महाराष्ट्राच्या विकासाचा ब्ल्यु प्रिंट अर्थात नकाशाच 'चक्क अमित शहा यांच्या हाती सुपुर्द केला. भाषणातुन दिल्लीचे तक्त हादरवणा-या राज ठाकरेंनी चक्क दिल्ली गाठुन महाराष्ट्राच्याच राजकीय तक्ताला हादरा दिला. मुंबईतील मराठी माणसासाठी, फेरीवाले, हातगाडीवाले, गुजराथी व्यावसायीक, यांच्या विरुध्द आवाज उठवणा-या राज ठाकरेंनी चक्क दिल्लीला फेरी मारुन 'गुजराथी पॅटर्न 'सोबतच युती केली.

महाराष्ट्राच्या महाविकास आघाडीतील कांही दिग्गज राजकीय पुढा-यांनी ऐन लोकसभेच्या तोंडावर आघाडीची बिघाडी करुन महाराष्ट्राची पिछाडी केली. सत्ता असतांनाचा आदर्श घोटाळा, भ्रष्टाचार, ईडीच्या भितीपोटी घेतलेला निर्णय असेल पण राज ठाकरेंची ना चौकशी, ना घोटाळा, ना भ्रष्टाचार, ना ईडी ची भिती, मग राज ठाकरेंनी का बदलली निती ? कशी होईल महाराष्ट्राची प्रगती ? २०१९ लोकसभा निवडणुकतीत मोदी - शहा यांच्या विरोधात प्रचार करणारे राज यांचे मनसेंच इंजिन २०२४ च्या निवडणुकीत मोदी - शहा यांच्या भाजपच्या जंक्शनवर धावतय, खरचं भाजपला याचा फायदा होईल का नाही..? याचे उत्तर मात्र लोकसभा निवडणुकीचे प्रवासी मतदारचं ठरवतील.

अशी भावना लोहा पालिकेचे माजी नगरसेवक वसंत पवार यांनी प्रसिध्दी पत्राद्वारे मांडली आहे.

# क्रिकेट स्टेडियमजवळ वाघाचा संशयास्पद स्थितीत आढळला मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी प्रसिद्ध असलेल्या जामठ्याच्या मैदानाजवळ चक्क वाघाचा अर्धवट कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली. मृत्यू तब्बल १५ दिवसांपूर्वीचा असून वाघाच्या कवटीला मार आहे. तर वाघाची दोन नखेही गायब आहेत. तरीही वनखात्याने घटनेचा पीओआर फाडला नाही. केवळ अवशेष न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवून देण्यात आले. चौकशीचा ससेमिरा टाळण्याचा हा प्रकार असल्याची चर्चा आहे. नागपूरपासून अवघ्या १८ किलोमीटरवर जामठा क्रिकेट स्टेडियम आहे. याच जामठालगत रुई हे गाव आहे. भवताली मोठ्या इमारती आणि घरे असलेल्या या परिसरात अर्धवट कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळला. त्यावरून साधारण १५ दिवसांपूर्वी हा मृत्यू झाला असावा असा अंदाज आहे. नागपूर वन विभागातील सेमिनरी हिल्स वनपरिक्षेत्रातील रुई गावाचा भाग आहे. वर्धा महामार्गाला लागून असलेल्या इडन पार्क वसाहतीतील कर्मचाऱ्यांना वाघाचा मृतदेह आढळून आला.

या वसाहतीपासून सुमारे ५० ते ६० मीटर अंतरावर असलेल्या या मृतदेहाबाबत वन विभागाला माहिती देण्यात आली. वनखात्यातील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. यानंतर ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्रातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले. वाघाच्या शरीराचे अवयव शाबूत असले तरी कवटीला मार असल्याने वाहनाच्या धडकेत त्याचा मृत्यू झाला असावा आणि कुणीतरी तो मृत वाघ बाजूला आणून टाकला असावा, अशीही शक्यता आहे. वनखात्याने मात्र हा मृत्यू नैसर्गिक असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची दाट शक्यता असतानाही वनपरिक्षेत्र अधिकारी सारिका आदमने यांनी आजूबाजूला साधी चौकशी करण्याची तसदी घेतली नाही. किंवा घटनेचा पीओआर फाडण्याचीही तसदी घेतली नाही. चौकशीचा ससेमिरा मागे लागू नये म्हणून ही प्रक्रिया सोयीस्कररित्या टाळण्यात आली. यासंदर्भात सेमिनरी हिल्स वनपरिक्षेत्र अधिकारी सारिका आदमने यांच्याशी वारंवार संपर्क साधला असता त्यांनी भ्रमणध्वनीला प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, राष्ट्रीय वाघ संवर्धन प्राधिकरणाच्या मानक कार्यप्रणालीनुसार ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राचे पशुवैद्यकीय अधिकारी पंकज थोरात व पशुवैद्यकीय अधिकारी राजेश फुलसुंगे यांनी शवविच्छेदन केले. त्यानंतर वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ही संपूर्ण कार्यवाही उपवनसंरक्षक डॉ. भारत सिंह हाडा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक मनोज धनविजय, सहाय्यक वनसंरक्षक विजय गंगावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद वाडे तसेच वनरक्षक हरीश किनकर यांनी पार पाडली. यावेळी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे प्रतिनिधी म्हणून अनिल दशहरे व प्रधान मुख्य वनसंरक्षक( वन्यजीव) यांचे प्रतिनिधी म्हणून मानद वन्यजीव रक्षक अजिंक्य भटकर उपस्थित होते.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेहाची पाहणी केली. जखमी झाल्याने किंवा आजारपणामुळे मृत्यू झाला असावा. वाघाच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी हा वाघ बसला होता. त्याच ठिकाणी सुमारे १५ ते २० दिवसांपूर्वी त्याचा मृत्यू झाला असावा. त्याची शिकार झाली असावी, असे प्रथमदर्शनी वाटत नाही. मात्र, तरीही आम्ही हाडे आणि उरलेले अवशेष पुढील तपासणीसाठी पाठविले आहे', अशी माहिती नागपूर वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. भारतसिंग हाडा यांनी दिली.



**दोन नखे गायब** : दरम्यान, वाघाची दोन नखे गायब असल्याचे वनविभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे . राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाच्या नियमानुसार यासंदर्भातील पुढील प्रक्रिया पार पाडण्यात आली . यावेळी, डॉ . हाडा यांच्यासह उमरेडचे सहायक वनसंरक्षक मनोज धनविजय, नागपूरचे सहायक वनसंरक्षक विजय गंगावणे, सेमिनरी हिल्सच्या वनपरिक्षेत्र अधिकारी सारिका वैरागडे, बुटीबोरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद वाडे, पशुवैद्यकीय अधिकारी अनिल दशहरे, प्रधान मुख्य वनसंरक्षकांचे प्रतिनिधी अजिंक्य भटकर, सातपुडा संस्थेचे सहायक संचालक मंदार पिंगळे, वनपाल रमधम यावेळी उपस्थित होते .



# लोकसभा मतदान जनजागृती मोहीम अंतर्गत संपूर्ण गावातून प्रभात फेरी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ताः खुलताबाद) येथील जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सुमारे तेराशे विद्यार्थ्यांनी गुरुवार (दि.21) सकाळी लोकसभा मतदान जनजागृती मोहीम अंतर्गत संपूर्ण गावातून प्रभात फेरी मिरवणूक व सेल्फी पॉईंट जनजागृती मोहीम यशस्वीपणे राबवली. शालेय बँड पथकाच्या वाद्यासह गावातील प्रत्येक गल्लीतून फेरी काढताना माझे मतदान माझा अधिकार बोटावर शाई बळकट लोकशाही मी मतदान करणारच मेरा वोट मेरा अधिकार प्रौढासह वृद्ध असो वा जवान सर्वांनी करा मतदान अशा जयघोषाने मतदानासाठी प्रबोधन करीत घोषणा देण्यात येत होत्या जागो जाग मिरवणूक थांबवून दुमदुमणाऱ्या घोषणांमुळे ग्रामवासी य प्रतिसाद देत होते व लक्षपूर्वक ऐकून बोध घेत होते ग्रामसचिवालय इमारती समोरील रंगनाथ प्रभात फेरीचा घोषणांचा घुमणारा आवाज ऐकत समस्त ग्रामस्थ एकत्रित जमा झाल्यावर सरपंच पदावर नलावडे यांनी स्वागत करून दिल्या जाणाऱ्या संदेशाचे वजन जागृती मोहिमेचे स्वागतच केले.

मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे केंद्रप्रमुख अशोक महालकर व सर्व शिक्षक या सहभागी झाले होते हा उपक्रम सलग चार ते पाच दिवस अशाच प्रकारे प्रभात फेरी द्वारा मतदान जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार मतदान प्रक्रिया यशस्वी व्हावी हा त्या मागचा उद्देश आहे.

# 'बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क'तर्फे महामोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** 'बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क'तर्फे आज बुलढाण्यात काढण्यात आलेला महामोर्चा म्हणजे आंबेडकरी समाजाचे (चळवळीचे) जंगी शक्तिप्रदर्शन ठरले. या मोर्च्यात महिलांसह भिक्कुसंघही मोठ्या संख्येने व जिद्दीने सहभागी झाले. आज, रविवारी दुपारी बुलढाणा चिखली राज्यमार्गावरील जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र (जुने डीएड महाविद्यालय) येथून या मोर्च्याला सुरुवात करण्यात आली. ऐतिहासिक भोन गावपरिसरातील मौर्यकालीन बुद्ध स्तूप आणि अवशेष नष्ट करण्याचे कारस्थान करणाऱ्या राज्य सरकार व प्रशासनाच्या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला. मोठी देवी, वन कार्यालय, तहसिल चौक, स्टेट बँक चौक मार्गे निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यलयावर येऊन धडकला.

# हौदातील पाणी पिल्याने जनावरांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील तिडका येथे हौदातील पाणी पिल्याने विषबाधा होऊन अकरा जनावरे दगावली तर अकरा जनावरे अस्थव्यस्त झाल्याची घटना तालुक्यातील तिडका येथे घडली. सोयगाव, बनोटी येथील पशूसंवर्धन पथक तिडका येथे तळ ठोकून उपचार करीत आहेत.

तिडका शिवारातील संदिप मगर यांच्या मालकीच्या गट क्रमांक ५५ मधील शेतात संदिप मगर यांची पाच जनावरे तर विष्णू मगर यांची चार आणि मुबारक पटेल, जगदिश मगर यांचे एकवीस जनावरे सकाळी चरण्यासाठी सोडली होती. चरून झाल्यावर गुरांना पाणी पिण्यासाठी केलेल्या हौदात गुरांनी पाणी पिले. पाणी पिल्यानंतर जनावरांची पाय हलके पडून एक एक करीत जमिनीवर पडली. सोयगाव आणि बनोटी पशुवैद्यकीय अधिकारी यांना भ्रमणध्वनीवरुन माहीती मिळताच तिडका गाठले आणि उपचार चालू केले. उपचार चालू असतांना संदिप मगर यांचे पाच, विष्णू मगर यांची चार आणि मुबारक पटेल यांचे दोन जनावरे असे एकूण अकरा जनावरांचा मृत्यू झाला.



# कात्रजमध्ये क्रिकेट खेळताना झालेल्या वादातून गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** क्रिकेट खेळताना झालेल्या वादातून गोळीबार करण्यात आल्याची घटना कात्रजमधील संतोषनगर भागात बुधवारी सायंकाळी घडली. गोळीबारात कोणी जखमी झाले नाही. मात्र, त्यानंतर दोन गटांत झालेल्या हाणामारीमध्ये दोन तरुणांवर शस्त्राने वार करण्यात आले. संतोषनगर भागातील घुंगुरवाला चाळ परिसरात तरुण बुधवारी सायंकाळी क्रिकेट खेळत होती. त्या वेळी तरुणांच्या दोन गटांत वाद झाला. वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. त्या वेळी एकाने पिस्तुलातून गोळीबार केला. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. दोन तरुणांवर शस्त्राने वार करण्यात आले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले असून, तो सराइत असल्याची माहिती देण्यात आली.




# मुख कर्करोग आणि आधुनिक उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथे इंडियन डेंटल असोसिएशन तर्फे मुख कर्करोग निदान व आधुनिक उपचार या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक 16 मार्च ला स्थानिक हॉटेल नर्मदा इन येथे करण्यात आले.

छत्रपती संभाजी नगर येथील नामवंत कर्करोग तज्ञ डॉक्टर रचिता बाहेती व डॉक्टर अशुतोष तोंडारे यांनी सखोल मार्गदर्शन केले. सर्वप्रथम धन्वंतरी पूजन व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे होते.

तोंडाच्या कर्करोगाची समस्या सामान्यता धुम्रपान मद्यपान गुटखा किंवा तंबाखू खाण्यामुळे उद्भवते. तोंडात न भरून येणारी जखम तोंडातून रक्त येणे व तोंडात वाढत जाणारी गाठ ,तोंड कमी उघडणे ,जबडा दुखणे, सतत कान दुखणे ,वजन कमी होणे ,जिभेचे दुखणे या समस्याकडे दुर्लक्ष करू नये. कॅन्सर म्हणजे मृत्यू नव्हे. कर्करोगाच्या लक्षणाबाबत जागरूक राहून आणि त्वरित वैद्यकीय मूल्यमापन करून आधुनिक उपचार पद्धतीमुळे यशस्वी उपचार करणे शक्य असल्याचे डॉक्टर रचिता बाहेती यांनी सांगितले.

यावेळेस डॉक्टर आशुतोष तोंडारे (स्तन विकार आणि कर्करोग तज्ञ ) तथा संचालक (I-BOCC CARE) यांनी समायोजित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर सेजल निर्खे आणि आभार प्रदर्शन डॉक्टर सचिन किनगे सचिव आयडीए बुलढाणा यांनी केले. कार्यक्रमाला बुलढाणा व परिसरातील नामवंत डॉक्टरांची उपस्थिती होती.

# फत्तेपूर येथे ९५ हजारांच्या वायरची चोरी; ग्रामपंचायतीची पोलिसांत तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील फत्तेपूर येथे गांवाला करोडो रुपये खचून गोद्री येथील कांग प्रकल्पाहून पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी स्वतंत्र वीज वाहिनी टाकलेली आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या -४० एचपी च्या इले. पानबुडीच्या मोटारीसाठी टाकलेली ९५ हजारांची इले. केबल वायरच चोरट्यांनी चोरून नेल्याने आजच गांवाचा पाणी पुरवठा ठप्प झालेला आहे. गावात पाणी पुरवठा बंदअसल्याने महिलासह गांवकरी पाण्यासाठी वणवण भटकंती करीत असल्या चे चित्र पाहायला मिळाले.

याबाबत ग्राम पंचायतीने पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. अदयापपर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही.गुन्हा केव्हा दाखल होईल, तपास केव्हा सुरु होईल, चोरीचा तपास लागेलच यांची खात्री नाही? जर ग्राम पंचायत पोलीस तपासाची वाट बघत बसली तर गांवाकर्यांचे काय? तो पर्यंत पाणी मिळणार नाही का? पोलीसांच्या तपासाची वाट न पाहता त्वरित इले. केबल वायर टाकून पाणी पुरवठा सुरु करण्याची मागणी होत आहे.येथील ग्राम पंचायतीची गोद्री धरणावर सार्वजनिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केलेली आहे. पाणी पुरवठा करणेसाठी ४० एचपी चा इले. पंप आहे. पंपापासून तर स्टार्टर असणाऱ्या पेटीपर्यंत अंदाजे १७५ मीटर कॉपर केबल इले. बाबर टाकलेली आहे. दि.१७ मार्च रोजी पाणी पुरवठा कर्मचारी इले. पंप सुरु करणेसाठी गेला. तर त्याठिकाणी वायर नसल्याचे समजले. केबल वायरची चोरटयांनी चोरी केल्याने दि. १७ मार्च पासून गांवात पाणी पुरवठा झालेला नाही. त्या अगोदर ३/४ दिवसांपासून पाणी मिळाले नाही. या इले. बायरी ची किंमत ९५ हजारांपर्यंत आहे. ऐवढ्या किंमतीची इले. वायर त्वरीत आणणे शक्य नसल्याने व याअगोदर या ठिकाणाहून अशीच इले. वायर याच मापाची चोरी झालेली होती.

म्हणून ग्राम पंचायतीने येथील पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. व चोरट्यांना पकडून चोरी गेलेली वायर मिळणेबाबत तक्रारीत म्हटले आहे.

या अगोदर अनेक शेतकऱ्यांच्या इले. पाणबुड्या चोरी झालेल्या आहेत. आज पर्यंत एकाही चोरीचा तपास लावण्यात पोलीस यशस्वी झालेले नाही. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी चोरीची तक्रारी देणेच बंद केलेले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या इले. पानबुडया, इले. बायरी, स्टार्टर, बीज तारा, वीज खांब चोरी झालेले आहेत. पोलीस तपास मात्र शुन्य आहे. आता ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठा करणाऱ्या इले. पानबुडीची ९५ हजार रुपये किंमतीची इले. बाबर चोरी झालेली आहे. त्यामुळे आजच गांव पाण्यासाठी भटकंती करतांना दिसत आहे. ग्रामपंचायतीला ऐवढ्या मोठ्या किंमतीची इले. वायर नवीन खरेदीसाठी फार अडचणी निर्माण होत आहे. यासाठी पोलीसांनी त्वरीत गुन्हा दाखल करून चोरी झालेल्या इले. वायरीचा तपास लाववा जेणे करून ग्राम पंचायतीचा पर्यायाने गांवकरी यांचा पैसा वाचेल त्याच प्रमाणे गांवाला पाणी पुरवठा होईल? अशी मागणी सुज्ञ नागरिक व स्थानिक प्रशासन करीत आहेत.




# भाजपा प्रदेश निवडणूक व्यवस्थापन व न्यायिक विभागातर्फे कार्यशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टी च्या प्रदेश निवडणूक व्यवस्थापन व न्यायिक प्रक्रिया विभागाच्या वतीने गुरुवारी भाजपा प्रदेश कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन लोकसभा निवडणूक व्यवस्थापन समितीचे प्रदेश संयोजक आ.प्रवीण दरेकर यांनी केले.

निवडणूक व्यवस्थापन समितीचे प्रमुख आ. श्रीकांत भारतीय यांनी या कार्यशाळेचा समारोप केला. यावेळी विधी विभाग प्रदेश संयोजक ॲड.अखिलेश चौबे, सह संयोजक ॲड.शहाजी शिंदे, ॲड.विनायक वाजपेयी आदी उपस्थित होते.

यावेळी ॲड.चौबे यांनी उपस्थित संयोजक व सह संयोजकांना आगामी लोकसभा निवडणूकीच्या तयारीसंदर्भात पीपीटी द्वारे मार्गदर्शन केले. निवडणूक अर्ज भरण्यापासून ते मतदान संपेपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रीये दरम्यान आवश्यक असलेली कायदे विषयक माहिती दिली. उमेदवाराच्या प्रचार मोहीमेसाठी घ्यावयाच्या विविध परवानग्या, उमेदवाराचा खर्च व निवडणुकीनंतरच्या कायदेशीर बाबींची पूर्तता कशी करावयाची याबाबतही श्री.चौबे यांनी विस्ताराने मार्गदर्शन केले. लोकसभा निवडणूक 2024 साठी निवडणूक व्यवस्थापन व न्यायिक विभागातर्फे कायदेशीर बाबींची इत्थंभूत माहिती देणारे हँडबूक तयार करण्यात आले आहे. या पुस्तिकेचे उपस्थितांना वितरण करण्यात आले.

या कार्यशाळेत निवडणूक व्यवस्थापन समितीचे सह संयोजक संदीप लेले यांनी उपस्थितांना निवडणूक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा समारोप करताना आ.श्रीकांत भारतीय यांनी संपूर्ण मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान काय खबरदारी घ्यायची हे विशद केले. भाजप कार्यकर्त्यांनी कायद्याचे, नियमांचे पालन केले पाहिजे. त्याचबरोबर प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या तांत्रिक, कायदेशीर चुकांकडे बारकाईने लक्ष देऊन त्या चुका संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे भारतीय यांनी सांगितले.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये गुंजणार आता 'या' राज्य गीताचाही नाद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आता राज्यातील सर्व शाळांमध्ये प्रार्थना, प्रतिज्ञा



नियमित होत असते. मुलांमध्ये चांगले संस्कार निर्माण व्हावे, देशभक्ती निर्माण व्हावी, भारतीय संस्कृतीची त्यांना माहिती व्हावी, यासाठी नियमित राष्ट्रगीत, प्रार्थना, प्रतिज्ञा होत असते. आता राज्य सरकारकडून आणखी एका गीताचा समावेश त्यात केला आहे. "जय जय महाराष्ट्र माझा..." हे राज्यगीत आता शाळांमध्ये नियमित म्हटले जाणार असल्याची माहिती प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा यांनी सांगितले आहे. त्यासंदर्भात शासनाकडून आदेश काढण्यात आले आहे. यामुळे बालपणीच विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची गौरवगाथा या गीताच्या माध्यमातून कळणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी मागणी केली होती."जय जय महाराष्ट्र माझा..." या गीतास राज्यगीताचा दर्जा महाराष्ट्र राज्य सरकारने दिला. वर्षभरापूर्वी हे गीत राज्यगीत झाले. त्यानंतर या गीताला त्याचा उचित सन्मान मिळत नव्हता. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत आपलं हे राज्यगीत गायलं वा वाजवलं जात नव्हतं ! महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष सन्माननीय अमित ठाकरे यांनी यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना पत्र लिहून ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत राज्यगीत वाजविले अन्

गायिले जावे अशी आग्रही अपेक्षा व्यक्त केली.अमित ठाकरे यांच्या या पत्राचा सकारात्मक परिणाम शासन दरबारी झाला. पत्रानंतर तीन आठवड्यांच्या आतच राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने शासन आदेश / परिपत्रक काढले आहे. त्यानुसार, "सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या प्रत्येक शाळेत दररोजचे वर्ग सुरू होताना राष्ट्रगीत / प्रार्थनेसोबत राज्यगीत वाजवले / गायले जाईल, याची दक्षता शाळा व्यवस्थापनांनी घ्यायची आहे. या सूचनेचे पालन होत आहे ना, याची दक्षता सर्व विभागीय शालेय शिक्षण उपसंचालकांनी घ्यायची आहे, असे पत्रक राज्यशासनाने काढले आहे. अमित ठाकरे यांनी पुढाकार घेतल्यामुळे राज्यातील शाळांमध्ये राज्यगीताचा सन्मान होत नसल्याची बाब राज्य सरकारच्या, विशेषतः शालेय शिक्षण विभागाच्या लक्षात आली. म्हणूनच शालेय शिक्षण विभागाने हे परिपत्रक काढले आहे. आता यापुढे प्रत्येक शाळेत निनादणार "जय जय महाराष्ट्र माझा...!"व राष्ट्रगीत होईल असल्याची माहिती दैनिक खोज मास्टर न्यूजेचे जिल्हा प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत यांच्याशी प्रा. जीवन कोलते पाटील यांनी दिली.

# मनमाडकरांची पाणी टंचाई तीव्र होण्याची चिन्हे

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** यंदा मार्चच्या अखेरीस मनमाडकरांना पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. सध्या मनमाड शहराला पाणी पुरवठा करणार्या वागदर्डी धरणात मृतसाठा आहे. जेमतेम आठ ते १० दिवस तो पुरेल. पालखेड धरणातील आवर्तनाचे पाणी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मार्च अखेरीस मनमाडकरांवर तीव्र पाणी टंचाईचे संकट कोसळण्याची शक्यता आहे. सुमारे ११० दशलक्ष घनफूट साठवणूक क्षमतेच्या मनमाड येथील वागदर्डी धरणात व त्याच्याशी संलग्न १६ दशलक्ष घनफूट क्षमतेच्या पालखेड साठवणूक तलावात सध्या मृत जलसाठा शिल्लक असून अनेकदा मनमाडकरांना गढूळ पाणी नळाद्वारे येत आहे. त्यामुळे साथीच्या आजारांचे रुग्ण सध्या शासकीय व खासगी रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. सध्या २२ ते २४ दिवसाआड एक वेळ अनियमित आणि अशुध्द असा पाणी पुरवठा सुरू आहे.

# श्रीक्षेत्र लोणी ते पैठण सखाराम महाराजांचा पालखी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**
**रिसोड :** तालुक्यातील लोणी हे श्री संत सखाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली नगरी ही विदर्भाची पंढरी म्हणून ओळखली जाते.विदर्भ मराठवाड्या बरोबरच सबंध महाराष्ट्रातून भाविक सखाराम महाराजांच्या दर्शनासाठी येत असतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री सखाराम महाराज यांची पालखी नाथषष्ठी उत्सवात सहभागी होण्यासाठी दिनांक 26 मार्च 2024 रोजी सकाळी आठ वाजता श्रीक्षेत्र पैठण कडे मार्गस्थ होणार आहे.
दिनांक 26/03/2024 रोजी सखाराम महाराजांची आरती झाल्यानंतर नगर परिक्रमा करून श्री संत सखाराम महाराजांची पालखी नाथ षष्ठी उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी लोणार मार्गे पैठण कडे मार्गस्थ होणार आहे .पालखीसोबत श्री सखाराम महाराज संस्थानचे वंशस्त प्राचार्य कल्याण महाराज हे राहणार असून पालखीचा पहिला मुक्काम नायगाव येथील रामभाऊ राठोड यांच्या शेतामध्ये राहणार आहे. दिनांक 27 मार्च रोजी सकाळी पालखी निघून रात्रीचा मुक्काम श्री बालाजी मंदिर



परतूर या ठिकाणी राहणार आहे. दिनांक 28 मार्च रोजी पालखी दैठणा मार्गे जाऊन अंबड येथील जयप्रकाश राठी यांच्या घरी पालखीचा मुक्काम राहणार आहे. 29 मार्च रोजी पालखीचा मुक्काम आपेगाव येथील पंडितराव ओटे यांच्या शेतामध्ये राहणार आहे. दि. 30 मार्च रोजी पालखी पैठण येथे पोहोचणार असून गाडेश्वर मंदिर परिसरातील मैदानामध्ये पालखीचा मुक्काम राहणार आहे .दिनांक 31 मार्च 2024 ते 2 एप्रिल 2024 पर्यंत पालखी पैठण येथे नाथषष्ठी उत्सवामध्ये सहभागी होणार आहे. 2 एप्रिल 2024 रोजी काल्याचे कीर्तनानंतर दुपारी पालखी निघून सायंकाळी श्रीराम मंदिर जालना या ठिकाणी पालखीचा मुक्काम राहणार आहे. डॉ राधेश्यामजी लड्डा यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन या ठिकाणी करण्यात आले आहे. 3 एप्रिल रोजी पालखी सकाळी जालना येथून निघून देऊळगाव वायसा येथून पालखी दुपारी निघून लोणी येथील श्री संत सखाराम महाराज संस्थान मध्ये आरती होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. पालखीसोबत ढोल ताशे ,बँड, दिंडीपताका,सखाराम महाराज भजनी मंडळ लोणी, लोणी खुर्द ,शिवनी , सोनुनागुंदा ,कापडसिंगी, आरडव,हिरडव, सवड , उटी , पिंपरी यांची भजनी मंडळी पालखीसोबत राहणार आहेत .तरी भाविक भक्तांनी पालखीचे दर्शन घेऊन सहभागी होण्याचे आवाहन श्री सखाराम महाराज संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

# गोटेंना चूक मान्य! स्वतःची लायकी दाखवून दिली

## राष्ट्रवादीचा विकासाला विरोध नाही: कैलास चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विकास कामांना विरोध नाही, पत्रकार परिषद घेवून माजी आ.गोटेंनी रस्त्याच्या कामात कचरा टाकल्याची चुक स्वतःच मान्य केली आहे. मात्र याप्रकारात माजी आ.गोटेंनी ठेकेदारावर आगपाखड करण्याऐवजी ज्यांनी चूक लक्षात आणून दिली त्यांच्यावर खालच्या पातळीवर आरोप करुन आपली लायकी दाखवून दिल्याचा सणसणीत टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी हाणला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात शहराध्यक्ष कैलास चौधरी यांनी पत्रकार परिषद घेवून गोटेंच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले. पारोळा रोड ते हत्तीडोहच्या रस्त्याच्या कामात ठेकेदार हा कचऱ्याचा भराव करत असल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला होता. या आरोपात शंभरटक्के तथ्य असल्याचे काल गोटेंनी पत्रकार परिषद घेवून मान्यच केला आहे. मात्र राष्ट्रवादीने केलेला आरोप माजी आ.गोटेंच्या



वर्मावर बसल्यामुळे ते खालच्या पातळीवर आरोप करत आहे. निकृष्ठ काम करणाऱ्या ठेकेदाराला पाठीशी ते घालत आहे. उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्यावर आरोप करुन माजी आ.गोटे प्रसिध्दी मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. इर्शाद जहागिरदारांसारखा उच्चशिक्षीत तरुण धुळे शहर आमदारकीला आव्हान उभं करतो, यामुळे गोटेंना पोटशुळ उठला आहे. उपमुख्यमंत्री अजीत पवार आणि प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागिरदार यांच्यावर टिका करणाऱ्या माजी आ.गोटेंचा राष्ट्रवादी निषेध करीत असून गोटेंनी आमच्या नेत्यावर टिका करण्याऐवजी रस्ताकामासोबत स्वतःच्या डोक्यातील कचरा डेपोतील कचरा टाकू नये असा सल्लाही राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी दिला आहे.या पत्रकार परिषदेला रविंद्र आघाव, रईस काझी, नरेंद्र अहिरे, ज्ञानेश्वर माळी, सुरेश अहिरे, राहुल पोळ,फरजाना शाह, आदी उपस्थित होते.

# प्राध्यापकांच्या कला, क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणारे गोंडवाना एकमेव विद्यापीठ : प्र-कुलगुरु

## शिक्षकांमधील कलागुणांचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयस्तरावर तसेच विद्यापीठ स्तरावर विविध शैक्षणिक कार्यक्रम व नाविण्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केल्या जाते. मात्र, प्राध्यापकांच्या कला व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणारे गोंडवाना हे एकमेव विद्यापीठ असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांनी केले.
गोंडवाना विद्यापीठाद्वारे शिक्षक क्रीडा व कला महोत्सवाचे आयोजन 19 ते 20 मार्च 2024 या दोन दिवसीय कालावधीत करण्यात आले होते. सदर महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. विवेक गोर्लावार, रामदासजी कामडी, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. अनिता लोखंडे, परीक्षक म्हणून मारोतराव इचोडकर, तुलाराम राऊत, मनीषा मडावी तसेच विविध विभागाचे प्राध्यापक आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना प्र-कुलगुरु डॉ. कावळे म्हणाले, विद्यापीठाच्या वतीने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या क्रीडा व कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य व प्राध्यापकांनी या कला व क्रीडा महोत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यापीठात नुकतेच झाडीबोली व युवा साहित्य संमेलन घेण्यात आले. महाविद्यालयस्तरावर अशा प्रकारच्या कला व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र, विद्यापीठांमध्ये प्राचार्य व प्राध्यापकांकरीता कला व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणारे गोंडवाना हे एकमेव विद्यापीठ असल्याचे ते म्हणाले.
व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. विवेक गोर्लावार म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या कुशल नेतृत्वातून प्राध्यापक वर्गांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रस्ताविकेत बोलतांना डॉ. अनिता लोखंडे म्हणाल्या, कलादर्पण-2024 हा शिक्षकांसाठी आयोजित केलेला शिक्षक क्रीडा व कला महोत्सव आहे. गतवर्षी देखील या महोत्सवाला उत्तम प्रतिसाद मिळाला. यावर्षी देखील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील प्राध्यापक मोठ्या उत्साहाने सहभागी झालेत. प्राध्यापकांना विविध परीक्षा विषयक कामे असतात. कामातील ताण कमी व त्यातून विरगुंळा मिळावा यासाठी अशा महोत्सवाचे आयोजन करणे महत्त्वाचे असल्याचे त्या म्हणाल्या. या शिक्षक क्रीडा व कला महोत्सवांमध्ये खेळ प्रकारात क्रिकेट, बॅडमिंटन व्हॉलीबॉल आणि बुद्धिबळ तर कला प्रकारात एकल गीत गायन, समूहगीत गायन, एकलनृत्य, समूहनृत्य आदींचा समावेश होता.
क्रिकेट(पुरुष) गटात प्रथम क्रमांक जे.एस.पी.एम. महाविद्यालय धानोरा, द्वितीय क्रमांक गुरुनानक विज्ञान महाविद्यालय बल्लारपूर, व्हॉलीबॉल खेळ प्रकारात प्रथम क्रमांक सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर, द्वितीय क्रमांक जे.एस.पी.एम. महाविद्यालय धानोरा, बॅडमिंटन डबल्स (पुरुष) गटात प्रथम क्रमांक गो. मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा येथील प्रा. गणेश सातपुते व प्रा. प्रमेश दाणी, द्वितीय क्रमांक ने.हि. महाविद्यालय ब्रह्मपुरी येथील डॉ. योगेश ठावरी व प्रा. जयेश हजारे तर उत्कृष्ट खेळाडूमध्ये जे.एस.पी.एम. महाविद्यालय धानोराचे प्रा. प्रशांत वाळके, प्रा. स्वप्निल बलोडे तर ने.हि. महाविद्यालय ब्रह्मपुरी येथील प्रा.धीरज आतला व प्राध्यापक रुपेश वाकोडीकर तसेच बॅडमिंटन डबल्स (महिला) गटात प्रथम क्रमांक सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथील डॉ. वैशाली थुल व डॉ. शरयू पोटमरवार तर द्वितीय क्रमांक ने.हि.महाविद्यालय ब्रह्मपुरी येथील डॉ. कुलजित कौर गिल, व प्रा. नीलिमा रंगारी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



# ॲड. आकाश आढाव यांचे 'प्रेमाच्या काठावर; पुस्तक वाचकांच्या भेटीला

## फलटण येथे आई-वडिलांच्या हस्ते प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**तरडगाव :** काही दिवसांपूर्वी फलटणचे युवा साहित्यिक ॲड.आकाश आढाव यांनी व्हॅलेटाईनच्या पूर्व संध्येला "प्रेमाच्या काठावर" या कादंबरीचे मुखपृष्ठ प्रकाशित केले होते. त्याच दिवशी हे पुस्तक लवकरच सर्वांच्या भेटीला येईल, असे ॲड.आकाश आढाव यांच्या कडून सांगण्यात आले होते. अखेर तो दिवस आला अन या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.फलटण येथे ॲड. आकाश आढाव
यांनी आई आणि वडिलांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन केले.यावेळी रेखा आढाव (आई) आणि शिवाजी आढाव (वडील) या दोघांच्या चेहऱ्यावर मुलाच्या नव्या पुस्तक प्रकाशनाने आनंद पाहायला मिळाला.या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियदर्शनी ज्ञानप्रबोधिनी विधी महाविद्यालय फलटणचे प्राचार्य अमित मोरे होते. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य रविंद्र बेडकिहाळ,ज्येष्ठ पत्रकार प्रा. रमेश आढाव, साहित्यिक सचिन गोसावी, युवा चित्रकार शुभांगी आटोळे आदी प्रमुख मान्यवरांसह इतर उपस्थित होते. ॲड.आकाश आढाव यांच्या या नूतन पुस्तकाबद्दल मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.
रविंद्र बेडकिहाळ म्हणाले की,प्रेमभंग आणि प्रेमश्राफल्य यातला मेळ घालून जीवन जगलं पाहिजे आणि साहित्यिकांनी आपल्या लिखाणातून समाजाला जास्तीत जास्त संदेश देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.असे सुध्दा त्यांनी सांगितले.रविंद्र बेडकिहाळ यांनी मराठी साहित्यातील बदलणारी कादंबरी आणि वेगवेगळ्या काळात बदलणाऱ्या प्रेमाच्या कथा यांचा वेध घेतला. तसेच आकाश आढाव यांनी भविष्यात आणखी ताकदीने लिखाण करावे.या शुभेच्छा सुद्धा दिल्या तसेच साहित्यिकांना लिखाणाचा भार पेलण्यातका त्यांचा खांदा मजबूत असावा असेही त्यांनी नमूद केले.
प्रियदर्शनी ज्ञानप्रबोधिनी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य अमित मोरे म्हणाले की,वकिली किंवा इतर क्षेत्रांत काम करणारी लोकं सध्या मानसिक दृष्ट्या ताणतणावात असतात त्यामुळे तणावमुक्त जगण्यासाठी एक तरी कला किंवा छंद आपण जोपासायला हवा आणि ही गोष्ट आमचे माजी विद्यार्थी आकाश आढाव यांचेकडून शिकावी. त्यांच्या लिखाणात एक नैसर्गिक भाव पाहायला मिळतो आणि महाविद्यालयाला नेहमीच त्यांचा अभिमान आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.प्रा.रमेश आढाव म्हणाले की, साहित्य निर्माण हे वाचन मनन चिंतन आणि व्यासंगातून होत असतं आणि प्रत्येक क्षेत्रातील लोकांच्या भावना त्यात उतरल्या पाहिजेत. आज लोकशाहीच्या चारही स्तंभाने मजबूत होऊन आपली भूमिका पार पाडण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. साहित्यिक सचिन गोसावी यांनी सांगितले की, लेखक आणि ॲड.आकाश भाऊ यांच्या लहानपणापासून ते आतापर्यंतचा संपूर्ण प्रवास आणि व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विषद करुन लिखाणाच्या वैशिष्ट्यावर प्रकाशझोत टाकला. मोठ्या धाडसाने वास्तविक परिस्तिथीवर आधारीत असणारी ही कादंबरी महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचले असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. लेखक आकाश आढाव म्हणाले, की यामागे माझी सात वर्षांची मेहनत आहे आणि ती मी वाया जाऊ देणार नाही.गेल्या सात वर्षांत या विषयाचा अभ्यास करून साध्या सरळ आणि वास्तव भाषेत लिखाण करुन मी व्यक्त झालो आहे आणि ही कादंबरी आपण एका बैठकीत वाचून पूर्ण कराल असा विश्वास वाटतो.माझं लिखाण माझ्या वाचकांनी स्विकारून प्रतिक्रिया द्याव्यात असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.
युवा पत्रकार सागर चव्हाण म्हणाले की,शांत, सयंमी, प्रत्यक्ष कमी बोलणारे आकाश भाऊ हे तेवढ्याच प्रखरतेने, स्पष्टपणे लिखाण करत असतात. आकाशभाऊंनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून केलेल्या छोट्या छोट्या पोस्ट सुद्धा बरंच काही सांगत असतात. स्वतः शिक्षण घेत असताना अनेक कष्टाची कामे त्यांनी केली आहेत. दुसऱ्यांच्या वेदनेने स्वतःचं मन घायाळ करणारे आणि देण्यासाठी स्वतःजवळ काही असेल ते निस्वार्थीपणे देत असतात. आकाशभाऊंनी लिहिलेली कादंबरी "प्रेमाच्या काठावर" या पुस्तकास मराठी वाचकांचा भरभरुन प्रतिसाद मिळेल.असा विश्वास व्यक्त करण्यात आला. चित्रकार शुभांगी आटोळे यांनी मुखपृष्ठ साकारतानाचे अनुभव कथन करुन मिळालेल्या संधिबद्दल आभार मानले. ह भ प नवनाथ महाराज कोलवडकर कवी सागर कुंभार आणि युवा कवी गुड्डाराज नामदास यांनीही आपल्या खास शैलीत शुभेच्छा व्यक्त केल्या.कार्यक्रमास लेखिका प्रतिक्षा आढाव,प्रमिला चव्हाण,प्रशांत कांबळे,कवी किरण अहिवळे,कवी प्रकाश कोडलकर,ॲड.जयवंत काकडे, ॲड.शुभम नलवडे,गणेश तावरे,अक्षय यादव,अमित डांगे,अनिल आवळे तसेच कायद्याचे विद्यार्थी कला साहित्य सामजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि मित्र परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प नवनाथ कोलवडकर यांनी केले.प्रास्ताविक ॲड.रमजान मुल्ला यांनी केले तर आभार प्रा.श्रेयस कांबळे यांनी मानले.

# महावितरणच्या प्रादेशिक स्तरावरील नाट्यस्पर्धेचे आज उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या प्रादेशिक स्तरावरील आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धा 22 व 23 मार्च 2024 रोजी तापडिया नाट्यमंदिरात होणार आहे. या स्पर्धेत महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयांतर्गत तिन्ही परिमंडलांतर्फे नाटकांचे सादरीकरण होणार आहे.
या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (22 मार्च) सायंकाळी 7 वाजता महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता हे राहतील. याप्रसंगी लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे व नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल डोये हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत शुक्रवारी (22 मार्च) सायंकाळी 7.30 वाजता छत्रपती संभाजीनगर परिमंडलातर्फे डॉ.गणेश शिंदे लिखित व श्रावण कोळनूरकर दिग्दर्शित 'उत्तरदायित्व' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात येईल. शनिवारी (23 मार्च) सकाळी 9 वाजता रत्नाकर मतकरी लिखित व प्रमोद देशमुख दिग्दर्शित 'ब्लाइंड गेम' हा नाट्यप्रयोग नांदेड परिमंडलातर्फे सादर करण्यात येईल, तर दुपारी 1 वाजता मोहन राकेश लिखित, विश्वनाथ राजपाठक अनुवादित व धनंजय पवार दिग्दर्शित 'आषाढातील एक दिवस' हा नाट्यप्रयोग लातूर परिमंडलातर्फे सादर करण्यात येईल.
स्पर्धेचे पारितोषिक वितरण शनिवारी (23 मार्च) दुपारी 4 वाजता छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता व छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते होणार आहे. नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने या प्रयोगांना उपस्थित राहून महावितरणच्या कलावंतांना प्रोत्साहित करण्याचे आवाहन स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव तथा छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी केले आहे.

# बेगमपुरा पोलिसांची मोठी कारवाई; दुचाकी चोर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** दुचाकी चोरायची.. पेट्रोल संपेपर्यंत वापरायची आणि नंतर मिळेल त्या जागी उभी करून निघून जायचे. अशा पद्धतीने अनेक दिवसांपासून दुचाकी पळविणाऱ्या एका अवलिया चोरट्याला बेगमपुरा पोलिसांनी गजाआड केले. त्याच्याकडून चक्क १२ दुचाकी जप्त केल्या. सर्व गाड्या वेगवेगळ्या पार्किंगमधून आणि रस्त्याच्या कडेला बेवारसपणे आढळल्या, हे विशेष, अशी माहिती पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांनी मंगळवारी (दि. १९) दिली. अंबर ऊर्फ बाळू विठ्ठल देवकर (२६, रा. फरशीफाटा, ता. फुलंब्री), असे चोरट्याचे नाव आहे. अधिक माहितीनुसार, १६ मार्च रोजी एमआयडीसी वाळूजमधून चोरलेली एक दुचाकी घाटी परिसरात असल्याची माहिती संबंधिताला मिळाली होती. तो ती दुचाकी पाहण्यासाठी घाटीत आला. तेव्हा चोरटा अंबर ऊर्फ बाळू हा दुचाकीला ड्युप्लीकेट चावी लावत असताना दिसला. त्यांनी लगेचच त्याला पकडले आणि बेगमपुरा पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिस निरीक्षक मंगेश जगताप, उपनिरीक्षक विनोद भालेराव, अंमलदार मीना पातोडे, शिवाजी कचरे, गणेश गायकवाड, शरद नजन, ज्ञानेश्वर ठाकूर, उमेश ठाकूर, गणेश हवाले यांच्या पथकाने अंबर देवकरची कसून चौकशी केली. त्याला पोलिसी खाक्या दाखविताच त्याने दुचाकी चोरीची कबुली दिली. एका दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात अटक करून पोलिस कोठडी घेतली. अंबर ऊर्फ बाळू देवकर याच्या बालपणातच त्याच्या आई-वडिलांचे निधन झाले. त्याला चार भाऊ आहेत, पण तेही त्याला जवळ करीत नाहीत. त्यामुळे अंबरला पहिलीतच शिक्षण सोडावे लागले. त्याचे भाऊ वाळूज एमआयडीसीत वेगवेगळ्या कंपनीत कामाला आहेत. हाही मिळेल ते काम करायचा, पण हळूहळू बटनच्या नशेची लत लागली आणि त्यातूनच त्याला दुचाकी चोरीची नशा लागली. फरशीफाटा या गावी त्याची १२ एकर शेती असूनही शहरात फिरण्यासाठी तो दुचाकी चोरी करीत असल्याचे पोलिस उपायुक्त बगाटे यांनी सांगितले.



# कालव्यात एकजण वाहून गेला; शोध सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात कान्होबा (कृष्णाची) काठी भक्तगण



खेडोपाडी फिरवत आहेत. बुधवारी (ता.२०) चित्तगिरी (ता. भोकर) गावात ते थांबले असता भोकर येथील यूवक बालाजी देशमुख (वय २०) सकाळी १० वाजता ईसापूर धरणाच्या कालव्यात स्नानासाठी गेला असता वाहून गेला आहे. शोधमोहीम सुरू असुन अद्याप त्याचा शोध लागला नाही. या बाबत माहिती अशी की, तालुक्यातील कान्होबाचे भक्त खेडोपाडी देवाची काठी फिरवत ग्रामस्थांना दर्शन देत आहेत.बुधवारी ते चित्तगीरी गावात थांबले असता भोकर शहरातील कृष्ण मंदिर गुंफा वसाहती मधील रहिवासी बालाजी प्रभाकर देशमुख हा सकाळी १० वाजताच्या सुमारास लगत असलेल्या ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्यात स्नानासाठी गेला. यावेळी तो पोहत असता पाण्याच्या उच्च दाबाने वाहून गेला आहे. चित्तगीरी येथील सरपंच प्रतिनिधी प्रवीण चव्हाण यांनी पोलीसांना माहिती दिली असता पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांनी घटनास्थळी भेट देवून शोध मोहीम सुरू केली पण पाण्याचा प्रवाह अधिक असल्याने यूवकाचा शोध लागला नाही.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ : जयराम धांडे

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीगोंदा :** गेले कित्येक वर्षापासून राज्यातील शिक्षकेतर बांधव आतुरतेने वाट पाहत होते. ती सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा 24 वर्षानंतर दुसरा लाभ अखेर लोकसभेच्या आचारसंहितेपूर्वी मिळविण्यात महामंडळाला मोठे यश आले आहे.

आज सायंकाळी सदर जी.आर. शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला. त्याची प्रत नाशिक विभागाचे कार्यतत्पर पदवीधर आमदार मा. सत्यजित तांबे साहेब यांच्या हस्ते महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांना देण्यात आली. या कामासाठी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर सर, महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने सर व महामंडळाचे कार्याध्यक्ष मा. मोरेश्वर वासेकर सर या सर्वांनी गेली कित्येक वर्ष यासाठी खूप मेहनत घेतली. त्याबद्दल त्यांचे राज्यातील सर्व शिक्षकेतर बांधवांच्या वतीने मनःपूर्वक आभार. यावेळी जिल्हाध्यक्ष,भिमाशंकर तोरमल सचिव, भानुदास दळवी पुणे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, उपाध्यक्ष प्रदिप गोसिवी,निवृत्ती लोखंडे,जयराम धांडे, जेष्ठ मार्गदर्शक भाऊसाहेब थोटे,कार्याध्यक्ष भागाजी नवले, प्रसिध्द प्रमुख आमोद नलगे, खजिनदार विजय हराळे, किशोर मुथ्था, नाना डोंगरे, सर्व जिल्हा पदाधिकारी, सर्व तालुका अध्यक्ष व सचिव उपस्थित होते.



# पीककर्जासाठी प्रशासनाने मध्य प्रदेशप्रमाणे 30 एप्रिलची मुदत द्यावी : विष्णुपंत भुतेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** पीककर्जासाठी तीन लक्ष रुपयांपर्यंत बीन व्याजी कर्ज मिळविण्यासाठीची कर्ज परतफेडीची सेवा सह सोसायटीची अंतीम मुदत 31 मार्च आहे. परंतु मध्यप्रदेश प्रशानातील सहकार विभागातील अवर सचिवांनी पत्र काढुन शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी एक महीना मुदत वाढ दिली. सेवा सह सोसायटीचे कर्ज परतफेड 30 एप्रिल पर्यत करण्याचा निर्णय म.प्र.ने घेतला आहे.

त्याच पध्दतीचा निर्णय महाराष्ट्रातील सहकार व पणन विभागातील वरिष्ठ आधिकार्यांनी घेतला पाहीजे म्हणुन भूमिपुत्र कडुन राज्याचे राज्यपाल, पणन संचालक



पुणे, व सचिव सहकार महाराष्ट्र यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. 31 मार्च कुठल्याच परिस्थीतीत शेतकऱ्यांना बॅक भरण्यासाठी योग्य तारीख नाही. शेतकऱ्यांना शेतातील मालाची मातीमोल भावाने विक्री करून पैसे उभे करावे लागतात किंवा व्याजाने काढुन बॅक भरावी लागते. त्यामुळे 31 मार्च एवजी 30 एप्रिल ही व्याज माफीची तारीख निश्चित करण्यासंदर्भात पत्र देण्यात आले आहे. सहकारी बॅक पीककर्जासाठी व्याज माफी करता 31 मार्चची अट घालते तर नॅशनलाईज बॅक तीनसे पासष्ट दिवसाची मुदत देतात. हा दुटप्पी पणा दिसत आसुनही आमचे राज्यकर्ते बोलत नाहीत हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आसल्याचे विष्णुपंत भुतेकर यांनी प्रसिद्धी पत्रात म्हटल आहे. आचार संहिता आसुनही मध्यप्रदेशच्या सहकार सचिवांनी पीककर्ज परतफेडीसाठी एकतीस मार्च एवजी तीस एप्रिल पर्यत परतफेडीची मुदत वाढवून दिली आहे. तोच निर्णय महाराष्ट्रातील प्रशासनाने घ्यावा म्हणून भुमीपुत्र कडुन निवेदन देण्यात आल्याचे त्यांनी सांगीतले.



# शिर्डीत भरदिवसा गोळीबार; जीवितहानी नाही

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात सकाळी अकरा वाजेच्या सुमारास साई मंदिरापासून जवळच असलेल्या साई लक्ष्मी पार्किंग मध्ये भर दिवसा दोन तरुणांनी गोळीबार केल्याने मोठी खळबळ उडाली आहे शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामचंद्र कुंभार व पोलीस पथकाने घटनास्थळी भेट देऊन एक दुचाकी व काढतुस तसेच एक दांडा या ठिकाणी जप्त केली असून या तरुणांचा शोध शिडी पोलिसांनी सुरू केला आहे.

अधिक माहिती अशी की शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पार्कींग येथे दोन तरुण आपल्या स्प्लेंडर वरून आले होते त्यांची काही तरुणा सोबध जुन्या वादातून बाचाबाची झाली दोघा तरुणांनी लाकडी दांडा उगारत पिस्तूल मधून हवेत गोळीबार करत पार्किंग मधून पळ काढला पार्किंगच्या लगत असलेल्या हॉटेल गुरुस्थान समोर असलेल्या एका हॉटेलच्या काचेवर ही गोळी लागली मात्र यात कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही पोलिसांना एक दुचाकी लाकडी दांडके मिळून आले आहेत गोळीबाराचा मोठा आवाज झाल्याने लगतच्या लोकांनी मोठी गर्दी केली तात्काळ पोलीस रामचंद्र कुंभार सं पोनी सागर काळे व पथकाने घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाची पाहणी केली.

भर दिवसा अशा प्रकारचा गोळीबार झाल्याने शिर्डी शहरात मोठ्या चर्चेला उधाण आले होते जी दुचाकी मिळून आली होती की कोणाची हे तरुण कुठले कशासाठी आले होते त्यांनी का गोळीबार केला असे विविध प्रश्न या निमित्ताने पुढे आले असून शिर्डी पोलीसांनी या प्रकरणात कठोर कारवाई करून आरोपींना जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांमधून पुढे येत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सर्व शक्तिनिशी 'वंचित'च्या पाठीशी रहा : राजेश्वर पालकर

## खुरगाव नांदुसात पौर्णिमोत्सव कार्यक्रम; थायलंडवरुन परतलेल्या उपासकांचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** देशातील जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी व भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी सर्व शक्तिनिशी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर पालमकर यांनी केले. ते तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात आयोजित पौर्णिमोत्सव कार्यक्रमात बोलत होते. यावेळी येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघ, डॉ. सिद्धार्थ जोंधळे, टी.पी. वाघमारे, इंजि. भारतकुमार कानिंदे, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रा. एस. एच. हिंगोले आदींची उपस्थिती होती.

दरमहा येणाऱ्या पौर्णिमेनिमित्त दर १९ तारखेला तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याअंतर्गत परित्राणपाठ, गाथापठण, बोधी पुजा, त्रिरत्न वंदना, ध्यानसाधना, भोजनदान, दान पारमिता, गीत गायन आदी कार्यक्रम घेण्यात येतात. यावेळी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याचनेनंतर भिक्खू संघाने त्रिसरण पंचशील दिले. ध्यानसाधनेनंतर मुख्य कार्यमास प्रारंभ झाला. बौद्ध राष्ट्र थायलंडच्या धम्माभ्यास दौऱ्याहून परतलेल्या उपासकांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची समयोचित भाषणे झाली.

या कार्यक्रमासाठी शहरातील सहयोग नगर, पीरबुऱ्हाण नगर तसेच अनिकेत नगर येथील उपासक उपासिकांनी भोजनदान आणि आर्थिक दान दिले. यात भीमाबाई गजभारे, सांची पवाडे, जयाताई सूर्यवंशी, सुधाताई कांबळे, कल्पनाताई ओव्हाळ, रेखाताई कोकरे, भारती बिऱ्हाडे, ज्योती गर्जे, अर्चना कांबळे, कल्पना काटकांबळे, शांताबाई जिंतुरकर, जयश्री खिल्लारे, जयश्री भगत, रंजना भवले, सुभद्राबाई सावते, सुमित्रा सावते, जयश्री राऊत, सुनंदा वाघमारे, शकुंतला वाठोरे, निर्मला रणवीर, पद्मीनबाई धुळे, विमलताई पाईकराव, रत्नमाला सोंडारे, कुसुम बुक्तरे, गौतमी कावळे, प्रभाताई इंगळे, कविता गायकवाड, संगिता निखाते, कांता निखाते, जिजा निखाते, पुष्पा भरणे, शोभाबाई राऊत, शांताबाई साळवे, सागर मल्हारे, सविता कांबळे, वत्सला कुपटीकर यांनी सहभाग घेतला.

खुरगाव नांदुसा परिसरात आकारास येत असलेल्या श्रामणेर दीक्षाभूमी धम्मसंकल्प बौद्ध स्तुपाच्या बांधकामासाठी उपासिका अंजना नागोराव बहातरे यांच्या परिवाराकडून एक लक्ष रुपयांचे दान देण्यात आले. तसेच अनेक उपासक उपासिकांनी देखील भिक्खू संघाकडे यथाशक्ती दान दिले. दरम्यान, थायलंड धम्माभ्यास दौऱ्याहून परतलेल्या मारोतराव उबारे, वंदना उबारे, निला भद्रे, भीमराव भद्रे, अनिता डोंगरे, श्रीरंग डोंगरे, भारती अटकोरे, छाया जाभाडे, उर्मिला जाभाडे, संभाजी कांबळे, संगिता निकाळजे, सुनील निकाळजे, प्रज्ञा नरवाडे, जयश्री गोवंदे, लक्ष्मी गायकवाड, ज्योती अंभोरे अरुणा पंडित, धोंडिबा लोणे, अनिता लोणे, शांताबाई आठवले, शंकर आठवले, मीनाक्षी खंदारे, चांदू खंदारे, अरुणा नरवाडे, गणपत नरवाडे, मंगल दवणे, पंजाबराव दवणे, श्रद्धा दवणे, प्रिया दवणे, संचिता दवणे, अनुरत्न वाघमारे, रोहित गजभारे, इंदुताई गजभारे, भीमराव गजभारे, विमलताई जोंधळे, चांदू जोंधळे आणि अरुणाबाई कांबळे या उपासक उपासिकांचा भव्य सत्कार करण्यात आला.

# महसूल कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती

## आचारसंहितेच्या पूर्वसंध्येला ना. विखेंचा हस्तक्षेप

आधुनिक केसरी न्यूज



**पारनेर :** लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता जाहिर होण्याच्या पूर्वसंध्येला राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी अधिकाऱ्यांवर दबाव टाकून केलेल्या महसूल विभागातील बदल्यांना मॅट न्यायालयाने स्थगिती देत मंत्री विखे यांना सनसणीत चपराक दिली आहे.

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता जारी होण्यापूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी राजकीय हस्तक्षेपातून अधिकाऱ्यांवर दबाव आणत महसूल विभागातील ४० ते ५० तलाठी, मंडलाधिकारी व अव्वल कारकून दर्जाच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. महसूल विभागातील या नियमबाहय बदल्यांविरोधात सबंधित कर्मचाऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील मॅट कोर्टात धाव घेत या निर्णयास आव्हान दिले होते. कर्मचाऱ्यांच्या अर्जाची दखल घेत मॅट कोर्टाने या बदल्या नियमबाहय ठरवत सर्व बदल्यांना स्थगिती दिली. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार नगर जिल्हयातील महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या राजकीय दबाव वापरून, त्यासाठी संबंधित तहसिलदारांना चुकीचे अहवाल देण्यास भाग पाडून तडकाफडकी नियमबाहय बदल्या करण्यात आल्या. एकीकडे नियमबाहय बदल्या करतानाच कर्मचाऱ्यांना धमकवण्यासाठी त्यांच्या विभागीय चौकशाही प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. राजकीय दबावातून घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे महसूल कर्मचाऱ्यांमध्ये तिव्र असंतोष आहे. महसूल मंत्र्यांच्या जिल्हयातच अशा प्रकारे नियमबाहय बदल्या करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हयाच्या महसूल विभागातील बहुतांश कर्मचारी नगर जिल्हयातीलच आहेत. लोकसभा निवडणूकीमध्ये ते मतदारही आहेत. असे असताना अशा प्रकारचा अन्यायकारक निर्णय घेण्यात आल्याने संबंधितांना भविष्यातील निवडणूकांमध्येही त्याची मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल अशी प्रतिक्रीया एका अन्यायग्रस्त कर्मचाऱ्याने दिली.



# कें. प्रा.शा. इटोली येथे निरोप समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** दि.२० मार्च रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप देत पुढील यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.या निरोपप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक भास्कर जुमडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तसेच इयत्ता ७ वी मधील काही विद्यार्थ्यांनी शाळेविषयी, शिक्षकांविषयी असणारा अखंड प्रेमळ, जिव्हाळा आपल्या मनोगतातून व्यक्त करत भावनिक झाले. आपली शाळेची आठवण कायमस्वरुपी राहावी या उदात हेतूने संत सेवालाल महाराजांची प्रतीमा शाळेला सदिच्छा भेट दिली.भास्कर चव्हाण यांनी गुरु शिष्याचं नात काय असतं तसेच ज्या शाळेनी घडवलं, शिकवल याची जानीव सदैव डोळ्यासमोर ठेऊन यशस्वी वाटचाल करावी असे मार्मिक शब्दात पटवून देत पुढील शिक्षणासाठी मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. *परमेश्वर मेनकुदळे यांनी निरोप म्हणजे ज्याप्रकारे नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे निरोपाच्या दोन बाजू आहेत एक म्हणजे सुख आणि दुसरी म्हणजे दूःख या दोन्हीही बाजू आमच्यासाठी खुप महत्त्वाच्या आहेत.

अशी पाखरे येती, अनेक स्मृती ठेऊनी जाती,दोन दिसाची रंगत संगत, दोन दिसाची नाती. या चार पंक्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करत यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गणेश येलाले,मंगेश मेश्राम,कौशल्या नागरगोजे व राधा कोद्रे आदिनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना पुढील यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. दुर्गा दक्ष या विद्यार्थीनीने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले व शिवानी मेनकुदळे यांनी उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनाने आभार मानले.



# चिंतामणी महाविद्यालय घुगुस येथे 'वार्षिक स्नेहसंमेलन' साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** स्थानिक चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळ, बल्लारपूर द्वारा संचालित चिंतामणी महाविद्यालय, घुगुस जि. चंद्रपूर येथील सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक 20/03/2024 रोज बुधवारला सकाळी दहा वाजता महाविद्यालयातील " वसंत- वैभव " सभागृहात एक दिवसीय "वार्षिक स्नेहसंमेलन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. रवीं धारपवार हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रा. संतोष गोहोकार, डॉ. नितीन कावडकर, प्रा. मंगेश जमदाडे, प्रा. गणेश सुरजुसे मंचावर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे आयोजक आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. महेंद्र कुंभारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ. रवि धारपवार यांनी विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम दरवर्षी महाविद्यालयात आयोजित करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावे, त्यांच्या कलागुणाचा विकास होणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे हा सांस्कृतिक कार्यक्रमाचा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयात दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येत असल्याचे प्रतिपादीत केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. मंगेश जमदाडे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणाचे प्रदर्शन करून विद्यार्थ्यांनी आपले नाव आणि महाविद्यालयाचे नाव लौकिक करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. महेंद्र कुंभारे यांनी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी यशासाठी सतत धडपड करून आपण आपल्या भाग्याचे शिल्पकार आहोत, तसेच आपल्या भविष्यात येणाऱ्या अडचणींना समर्थपणे समोरे जाऊन विद्यार्थ्यांनी त्याचा खंबीरपणे संघर्ष करण्याची ताकद निर्माण केली पाहिजे, तरच आपण भावी आयुष्यात फार मोठे यश प्राप्त करू शकतो, असे विद्यार्थ्यांना महत्त्वाचे मार्गदर्शन करून प्रेरित केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रदर्शन करून श्रोत्यांची मने जिंकली. यावेळी ग्रंथालय विभागाच्या वतीने बी. ए. भाग तीन ची विद्यार्थिनी कु. धनश्री पिदूरकर या विद्यार्थिनीला "बेस्ट रीडर "म्हणून महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. रवि धारपवार यांनी सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन कु. निशा चाफले यांनी केले. तर आभार कु. अवंतिका कामतवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पथक परिश्रम घेऊन मोलाचे सहकार्य केले.

# नागरिकांना पाहता येईल उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र व शपथपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदार संघात उमेदवारांकडून दाखल करण्यात येणारे नामनिर्देशन पत्र व त्यासोबतचे शपथपत्र नमुना – 26, नागरिकांना विविध कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच ऑनलाईनसुध्दा पाहता येणार आहे.

उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र व शपथपत्र नमुना – 26, नागरिकांच्या अवलोकनार्थ चंद्रपूर लोकसभा मतदार संघात समाविष्ट जिल्हा परिषद कार्यालय, महानगरपालिका, सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिल कार्यालय, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायत आणि ग्रामपंचायत कार्यालयांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच भारत निवडणुक आयोगाच्या HTTPS://AFFIDAVIT.ECI.GOV.IN या संकेतस्थळावर सुध्दा शपथपत्र नमुना- 26 अपलोड करण्यात येणार असल्यामुळे या संकेतस्थळावर देखील नागरिकांना शपथपत्र नमुना- 26 पाहता येईल.

13 - चंद्रपूर लोकसभा मतदार संघातून लोकसभेसाठी होणाऱ्या निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्रे दिनांक 20 मार्च 2024 सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) निवडणूक निर्णय अधिकारी, 13-चंद्रपूर लोकसभा मतदार संघ तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे दिनांक 27 मार्च 2024 पर्यंत कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयातील कक्षामध्ये दाखल करता येतील. नामनिर्देशन पत्रे वरील ठिकाणी कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक 28 मार्च 2024 रोजी सकाळी 11 वाजेपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या (विस कलमी सभागृह) येथे सुरु करण्यात येईल.

ज्या उमेदवारांना उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यांचे अर्ज 30 मार्च 2024 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत उपरोक्त अधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. चंद्रपूर लोकसभा मतदार संघात मतदान 19 एप्रिल 2024 रोजी सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे.



# प्रवक्त्याच्या एका पत्रावर दीड कोटीचा रस्ता केला मंजूर

## मंत्री गिरीष महाजनांची कार्यपद्धती : राम कुलकर्णींनी मानले आभार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन वेगवेगळ्या भुमिकेत नेहमीच पहायला मिळतात. राजकारणातला संकटमोचक म्हणुन त्यांच्याकडे पाहिल्या जाते. कुठेही, कधीही किचकट परिस्थिती निर्माण होते तेव्हा हाच चेहरा आपणाला दिसतो. स्वतःच्या मतदारसंघात त्यांची असलेली अफाट लोकप्रियता याचं गुपित जेव्हा पुढे येतं त्यातुन त्यांची कार्यपद्धती तत्परता ज्यामुळे लोक प्रेम करतात. असाच एक अनुभव भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांना आला असुन व्हॉटसअपवर पाठवलेल्या एका पत्रावर शेत रस्त्यासाठी दिड





कोटीचा रस्ता मंजुर केला. त्यांचे ओएसडी निशिकांत देशपांडे यांनी दाखवलेली तत्परता कार्यकर्त्यांच्या प्रबलतेसाठी किती उपयुक्त आहे हे देखील लक्षात येते. एकही मुंबईला चक्कर न पडता काम मंजुर झाल्यानंतर कुलकर्णी यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले. मंत्री गिरीष महाजनांच्या कामाची पद्धती खरंच अफलातून म्हणावी लागेल. राजकारणात काम करताना मंत्री, नेते, खासदार, आमदार संघटनात्मक पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांची दखल घेतातच असे नव्हे. वास्तविक पहाता सत्ता काळात पदाधिकारी असोत किंवा सामान्य कार्यकर्ते असोत यांना लोकप्रतिनिधींनी न्याय दिला तरच संघटनेत काम करणाऱ्या लोकांना कामासाठी बळ मिळते. पण साऱ्याकडूनच असं घडतं असं नाही, अलीकडे मंत्र्यांना फोन लावला तर उचलायला वेळ नसतो. पण याला अपवाद महाजन निश्चित म्हणावे लागतील. प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी त्यांना माजलगाव परिसरातील सिंदफणा ते परीट वस्ती हा सैलानी बाबा देवस्थानला जाणारा रस्ता जो जिल्हा परिषद यांच्या मालकीचा आहे. या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ०२ मार्चला ओएसडी निशिकांत देशपांडे यांना व्हॉटसअपवर पत्र दिले. त्यांनी दाखवलेल्या तत्परतेवर मंत्री महोदयाने तात्काळ दखल घेत सदर कामाला रस्ते व पुल दुरूस्ती परीक्षण कार्यक्रमांतर्गत गट ब मधील नियोजनानुसार दि.०७ मार्च रोजी सुमारे ०१ कोटी २५ लाख आर्थिक तरतुदीसह मंजुरी दिली. अनेक वर्षापासून सदर रस्त्याच्या दुरूस्तीसाठी मागणी होत होती. आ. प्रकाशदादा सोळुंके यांनी देखील या प्रश्नावर पुढाकार घेतला होता. रस्ता मंजुरीनंतर प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी मंत्री महोदयाचे आभार मानले. विशेष बाब म्हणजे मुंबईला येण्याएवढे सुद्धा परिश्रम मंत्री महोदयांनी घेवु दिले नाहीत. निशिकांत देशपांडे यांनी दुरध्वनीवर संपर्क करून कुलकर्णी तुमचं काम झालं म्हणत मंजुरी पत्र पाठवलं. सांगायच एवढंच आहे की, मंत्री महोदयाच्या हाताखाली काम करणारे शासकिय अधिकारी हे देखील संवेदनशील आणि कार्य तत्पर असतील तर संघटनात्मक पदाधिकाऱ्यांना घरबसल्या न्याय कसा मिळु शकतो? याचं उत्तम उदाहरण हे होय. या मंजुरीमुळे सैलानी बाबाला जाणारा दिड किमीचा रस्ता आता चांगला होईल. या भागातील शेतकऱ्यांनी आनंद साजरा केला असुन कुलकर्णी यांचे अभिनंदन केले.



# उमरीमध्ये मराठा आंदोलकांना जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींना रस्त्यावर अडवून जाब विचारण्यासाठी गेलेल्या आंदोलकावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्या आंदोलकांना आज उमरी न्यायालयाने जामीन मंजूर केला. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात सर्वत्र आंदोलन सुरू असुन या आंदोलनाचा भाग म्हणून राजकीय नेत्यांना गाव बंदी करण्यात आली होती गावबंदी सुरू असताना या भागाचे आमदार राजेश संभाजी पवार हे उमरी येथे आले असताना त्यांना मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जाब विचारण्यासाठी गेलेल्या राजेश पाटील मोरे, बालाजी पाटील ढगे, दत्ताहारी पाटील ढगे गुलाब पाटील जाधव गोपीराज पाटील बेलकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना आज उमरी न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. यावेळी मारोती पाटील सुर्यवंशी, शामसुंदर पाटील ढगे, सुभाष पाटील हिवराळे, दिगांबर पाटील शिंदे चक्रधर पाटील बेलकर बालाजी पो.पा.ढगे उपस्थित होते.

# डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात सुविधामध्ये भरघोस सूट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री रामनवमीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित डॉ. हेडगेवार रुग्णालय आणि श्री रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या नव्याने सुरू होणाऱ्या महाविद्यालयाच्या निमित्ताने आजपासून ते श्रीरामनवमीपर्यंत म्हणजेच दि. १७ एप्रिल पर्यंत प्राथमिक तपासणी शुल्क माफक दरात आकरण्यात येईल. तसेच, काही विशेष तपासण्या मध्ये २५% सूट तर शस्त्रक्रिये वर ५०% पर्यंत सूट देण्यात येईल.

डॉ. हेडगेवार रुग्णालय गेली ३५ वर्षं उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देत आहे असून आता लवकरच उत्कृष्ट वैद्यकीय शिक्षणाकडे वाटचाल करणार आहे. डॉ. हेडगेवार रुग्णालयात सकाळी आठ वाजेपासून दुपारी बारा वाजेपर्यंत प्रथम येणाऱ्या दोनशे रुग्णांना फक्त वीस रुपयांमध्ये (ओपीडी) प्राथमिक तपासणी करण्यात येईल. तसेच १७ मार्च ते १७ एप्रिल या एक महिन्याच्या कालावधीमध्ये निवडक रेडिओलॉजी (एक्स-रे) व निवडक पॅथॉलॉजी सर्व्हिसेस मध्ये २५ टक्क्यांची सवलत तसेच विविध शस्त्रक्रियांवरती ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. डॉ. हेडगेवार रुग्णालय संचलित वस्तीमधील तिन्ही सेवा केंद्रांवर ही सूट देण्यात येईल. स्त्रीरोग तसेच अन्य काही सर्जिकल प्रोसेससाठी ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेवेळी संस्थेचे सहकार्यवाह डॉ महेश देशपांडे, वैद्यकीय महाविद्यालच्या अधिष्ठाता डॉ. स्वाती शिरडकर आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजश्री रत्नपारखे यांची उपस्थिती होती.

वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात पदार्पण करत असताना रुग्णालयाचे सामाजिक दायित्व लक्षात घेता रुग्णालयामार्फत अनेक विभागात सवलत दिली जाणार आहे, अशी माहिती संस्थेचे सहकार्यवाह डॉ महेश देशपांडे यांनी दिली.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी प्रवीण सपकाळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या संघटनेच्या राज्य कार्याध्यक्षपदी जळगाव येथील प्रविण सपकाळे यांची निवड झाली आहे. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्य कमिटीच्या बैठकीत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. यावेळी संघटनेचे राज्य महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे व राज्यभरातील विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुणे येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात पत्रकार संघाचे उपक्रमशील पदाधिकारी असलेले उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष असलेले प्रवीण सपकाळे यांची राज्य कार्याध्यक्ष म्हणून निवड केल्याचे जाहीर करण्यात आले. सपकाळे यांना सर्व राज्य कार्यकारीणीच्या पदाधिकारी व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.



# शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पंचायत समिती शिक्षण विभागाकडून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी तालुकास्तरीय प्रशिक्षणास आज प्रारंभ झाला. शहरातील श्री संत गाडगे महाराज माध्यमिक विद्यालयात तीन दिवशीय प्रशिक्षण चालणार असल्याची माहिती प्रशिक्षण समन्वयक संजय अकोले यांनी दिली.

दि.१८ मार्च २०२४ ते दि.२० मार्च २०२४ रोजी तीन दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन सतिश व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थिती गुट्टे बी पी विस्ताराधिकारी लोहा पं.स्. तर, प्रमुख पाहुणे म्हणून बोधगीरे डी एस याची उपस्थिती होती. तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांना क्षमता वृद्धी करीता प्रशिक्षण सलग तीन दिवस चालणार आहे.आज दि.१८ मार्च रोजी प्रारंभी प्रशिक्षणास बहुसंख्य शिक्षकांची उपस्थिती होती. यावेळी प्रशिक्षण समन्वयक संजय अकोले, संनियंत्रक हावगी जामकर, धुतराज सर्वजीत, तिडके परमेश्वर याच्याकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे.



